संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११६३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रुपये अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०२.०५.२०२५ अंक नं. २७ वर्ष ६८ वे दैनिक वर्ष ६२ वे ANR/022/2018-2020

भावपूर्ण
श्रध्दांजली



काका

चंद्र सूर्य तारे आहे तो पर्यंत
असेल तुमची किर्ती..
मनामनात राहील
सदैव तुमची मुर्ती..

आमचे पारिवारिक स्नेही व नगरशहराचे लाडके नेते
स्व. मा. आ. अरुणकाका जगताप
आपल्या प्रेमळ स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली !

जगताप परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत..

शोकाकुल
सुभाषचंद्र पेमराज पोखरणा
व पोखरणा परिवार (मांडवगणवाला)
मे. सुभाषचंद्र हेमराज पोखरणा
शांतीदूत ड्रेसेस | अक्षता सारीज्
अहिल्यानगर

## विधान परिषद माजी सदस्य अरुण जगताप यांनी घेतला अखेरचा श्वास



नगर – विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून सलग २ वेळा विजयी झालेले माजी आमदार अरुणकाका बलभीमराव जगताप (वय ६७) यांचे २ मे रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या मेंदूत रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांना ५ एप्रिल रोजी पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तब्बल एक महिना त्यांनी मृत्यूशी झुंज दिली. अखेर आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. आमदार संग्राम जगताप यांचे ते वडील होत.

दिवंगत अरुण जगताप यांचा जन्म २५ मार्च १९५९ रोजी झाला होता. काकांनी श्रीगोंदा तालुक्यातील बनपिंप्री या छोट्याशा खेड्यातून नगर शहरात येवून येथे आपले व्यावसायिक आणि राजकीय साम्राज्य निर्माण केले. सन १९८६-१९८७ मध्ये युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदापासून

(मजकूर व छायाचित्र पान २ वर)



प. पु. श्री. प्रवीणऋषीजी म.सा.
प. पु. श्री. तीर्थेषऋषिजी म.सा.

मंगल प्रवचन



आओ निखारे–तुटते रिश्ते,
बिखरते परिवार
शनिवार, दि. ३ मे २०२५, वेळ : रात्री ८ वाजता.
स्थान
आनंदधाम, अहिल्यानगर

दशा, दिशा, लक्ष्य चातुर्मास–२०२६
रविवार, दि. ४ मे २०२५, वेळ : सकाळी ९ वाजता.
स्थान
केशर गुलाब मंगल कार्यालय, अहिल्यानगर

विनित
श्री वर्धमान स्थानकवासी सकल जैन श्रीसंघ, अहिल्यानगर

एक
सर्वमान्य
नेतृत्व
हरपलं..
आपल्या स्मृती आम्हांस सदैव प्रेरणादायी राहतील.

स्व.श्री. अरुणकाका बलभिमराव जगताप
(स्वर्गवास : शुक्रवार 2 मे 2025)

जगताप परिवाराच्या दु:खात आम्ही सामील आहोत

- दु:खांकित -
ॲड. अशोक बन्सीलालजी कोठारी
डॉ. रमेश, सुमतीलाल, अतुल
कांतीलाल चंदुलालजी कोठारी
अमृत, अनिल
आनंद, अमित, आशिष, आदेश
समस्त कोठारी परिवार
जामखेड व अहिल्यानगर



Nirmal

कमी ऐकू येते का ?
त्वरीत संपर्क साधा
8380041240

* लंडन येथून उच्च शिक्षित ऑडिओलॉजिस्टकडून श्रवण क्षमता आणि श्रवण यंत्राबाबत मार्गदर्शन मिळवा.
* नैसर्गिक आवाजासाठी सर्वात अद्ययावत श्रवणयंत्र उपलब्ध.
* योग्य मार्गदर्शन आणि प्रथम श्रेणी श्रवण सहाय्य सेवांसाठी भेट द्या.
* चार्जेबल हेरिंग हेड उपलब्ध
* काना आतील सूक्ष्म श्रवण यंत्र उपलब्ध.
* सिम्प्रिया कंपनीचे एकमेव अधिकृत विक्रेते

स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल ॲण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी,
अहिल्यानगर - 414003.
दुकान वेळ : सकाळी १० ते सायं. ७.००
kalika

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate,
Station Road,
Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

सुट्ट्या लागल्या
भाच्यांना, बहिणीला कपडे घ्यायचेत...?
चला तर मग मयुरी मॉलला
१५-१६ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींसाठी
● सर्वांसाठी सर्व प्रकारचे कपडे
● असंख्य नवनवीन व्हरायटीज्
● होलसेल पेक्षाही कमी दरात



बाबा सुट
फ्रॉक
पार्टीवेअर ड्रेस
व बरेच काही

अहमदनगर जिल्ह्यातील प्रथम भव्य लेडीज मॉल
मयुरी लेडीज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहमदनगर. 9028201188

प्रथम पुण्यस्मरण



स्व. रीटा सेठी

आपने सबको दिया दुलार
आपकी स्मृतियां है अब आधार,
आपके कर्म प्रेरणा है हमारी
आपका व्यवहार हमारा सुत्रधार ।

आपकी प्रथम पुण्यतिथि पर
हम सभी परिवार जन आपको
अश्रुपूरित श्रध्दांजलि अर्पित करते हैं ।

* श्रध्दावन्त *
संजय सेठी | रिषभ सेठी
सौ. संजना खोसला
सेठी एवं नय्यर परिवार

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com



माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या अंत्यदर्शनासाठी भवानीनगर येथील निवासस्थानी झालेली गर्दी.



माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या निधनामुळे कापड बाजार, मोची गल्लीमधील व्यापाऱ्यांनी सर्व व्यवहार बंद ठेवल्याने दिसत असलेला शुकशुकाट.

# काकांनी घेतला अखेरचा श्वास

(पान १ वरुन)

आपल्या राजकारणाचा श्रीगणेशा केला. नगरपालिकेत ते नगरसेवक झाले. सलग पाच वर्ष ते तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेचे नगराध्यक्ष राहिले. विधानसभेला अहमदनगर शहर मतदारसंघातून सन १९८९ व १९९९ असे दोन वेळा ते अपक्ष म्हणून उभे राहिले मात्र दोन्ही वेळा ते पराभूत झाले. सन २००८ मध्ये महापालिकेत ते पुन्हा नगरसेवक म्हणून निवडून आले. मात्र स्वत:ऐवजी त्यांनी त्यांचे चिरंजीव संग्राम जगताप यांना महापौर केले.

## विधानपरिषदेवर सलग २ वेळा निवडून गेले

विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून सलग २ वेळा (सन २००९ व २०१६) ते निवडून गेले होते. जिल्हा बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम केले. आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष म्हणून ते अनेक वर्षांपासून काम पाहत होते. जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी क्रीडा क्षेत्रात ठसा उमटवला. अहमदनगर जिल्हा बॉडी बिल्डींग असोसिएशनचे ते अध्यक्ष होते. राज्यस्तरीय मानाच्या महाराष्ट्र श्री बॉडी बिल्डींग स्पर्धेचे यशस्वी आयोजन त्यांनी केले होते. याशिवाय नगरमध्ये प्रथमच राष्ट्रीय स्तरावर हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेचे यशस्वी आयोजन त्यांनी केले होते. घोडेस्वारी, नव्या महागड्या गाड्यांचा छंद. शेती, उद्योग, हॉटेल व्यवसायात त्यांना विशेष रुची होती. त्यांचा सर्व जाती धर्मांमध्ये मोठा मित्रपरिवार होता.

## शहरात राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व वाढवले

तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या काळात त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. मात्र ते सहा महिनेच तिथे रमले. पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येऊन त्यांनी संघर्ष केला. नगर शहरात राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व वाढविण्यात त्यांचा मोठा वाटा होता. जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्षपदही त्यांनी सांभाळले होते. त्यांचे चिरंजीव संग्राम जगताप हे सलग तीनवेळा अहिल्यानगर शहर मतदारसंघातून निवडून आले तर दुसरे चिरंजीव सचिन जगताप हे जिल्हा परिषदेचे सदस्य होते. आमदार शिवाजीराव कर्डिले आणि भानुदास कोतकर यांचे ते व्याही होत.

## कोरोना संकट काळात गोरगरिबांना दिला आधार

सन २०२०-२०२१ कोरोना संकट काळात शहरातील व जिल्ह्यातील सर्वसमान्य गरजू नागरिकांना आधार देत धान्य पुरवठा करून आरोग्य सुविधा देऊन अनेक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच आ.संग्राम जगताप यांच्या साथीने गुणे आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये कोविड सेंटर सुरु करून ऑक्सिजन प्लांट उभारला. वडील स्व.बलभीमराव जगताप हे पंढरीचे वारकरी होते. त्यांचा धार्मिक कार्याचा वारसा काकांनी पुढे चालवला. शहरातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रिडा, सांस्कृतिक इ. क्षेत्राला सहकार्य करत विविध कार्यक्रम घेण्याबाबत त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. तसेच अनेक मंदिरे उभारून सर्व जातींच्या संतांच्या नावाने अनेक सांस्कृतिक भवन त्यांनी उभारले. अरुणोदय गो शाळेच्या उभारणीत सहकार्य करून गोसेवेतही अरुणकाका जगताप यांचा पुढाकार होता.

## काळापुढे 'दवा आणि दुवा' लागू पडल्या नाहीत

नियमित आरोग्य तपासणीसाठी ते ४ एप्रिल रोजी पुणे येथील रुग्णालयात गेले होते. मात्र तेथेच त्यांची प्रकृती बिघडली. मेंदूत रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांना ५ एप्रिल रोजी उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेव्हापासून त्यांना व्हेंटीलेटर (कृत्रिम श्वासोच्छवास) ठेवण्यात आले होते. महिनाभर शहरासह जिल्ह्यात सर्वधर्मियांनी त्यांच्या आरोग्यासाठी धार्मिक स्थळांमध्ये प्रार्थना केल्या होत्या. परंतु काळापुढे 'दवा आणि दुवा' लागू पडल्या नाहीत व अखेर २ मे रोजी पहाटे त्यांचा श्वास थांबला गेला. काकांच्या निधनाने नगर शहरासह जिल्ह्यात शोककळा पसरली.

## बाजारपेठेत दुकाने बंद ठेवून व्यापाऱ्यांनी वाहिली श्रद्धांजली

जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या निधनानंतर कापड बाजार, मोची गल्लीमधील व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार बंद ठेवून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. शुक्रवारी (दि.२ मे) सकाळपासूनच बाजारपेठेत गहिवरलेले वातावरण होते. दुकानदारांनी स्वयंस्फूर्तीने व्यवहार बंद ठेवत आपले दु:ख व्यक्त केले.

अरुणकाका जगताप यांच्या निधनाची माहिती कळताच संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. दुकाने बंद असल्यामुळे कापड बाजार आणि मोची गल्लीत नेहमीचा गजबजाट दिसून आला नाही. बाजारपेठेत शुकशुकाट होता.

अरुणकाका जगताप यांचे बाजारपेठेतील प्रत्येक जाती-धर्माच्या व्यापारी आणि दुकानदारांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या निधनाची बातमी अत्यंत दु:खद व नगरकरांच्या मनाला चटका लावणारी आहे. अहिल्यानगरच्या राजकारणात, समाजसेवेत त्यांचे अमूल्य असे योगदान राहिले. त्यांच्या निधनाने शहराचे मोठे नुकसान झाले असून, दूरदृष्टीचा नेता गमावला असल्याची भावना व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. मार्केट यार्ड मधील व्यापाऱ्यांनीही सकाळपासूनच आपले सर्व व्यवहार बंद ठेवले होते.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वाहिली श्रद्धांजली

माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रद्धांजली वाहिली. आपल्या शोक संदेशात त्यांनी म्हंटले आहे की, माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या दु:खद निधनानं राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, शिक्षण, सहकार अशा अनेक क्षेत्रात कार्यरत असलेलं, सामान्यांची घट्ट नाळ जुळलेलं कर्तृत्ववान नेतृत्व हरपलं आहे. तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेचे अध्यक्ष, जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष, प्रयोगशील शेतकरी, वारकरी संप्रदायाचा सच्चा पाईक म्हणून ते कायम अहिल्यानगरवासियांच्या लक्षात राहतील. त्यांचे निधन ही अहिल्यानगर जिल्ह्याची मोठी हानी असून त्यांच्या निधनाचा धक्का पचवण्याची शक्ती त्यांचे पुत्र आमदार संग्राम जगताप, संपूर्ण जगताप कुटुंबीय आणि कार्यकर्त्यांना मिळो, अशी प्रार्थना करतो. आम्ही सर्वजण जगताप कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहोत. दिवंगत अरुणकाकांच्या आत्म्यास सद्गती लाभो, ही प्रार्थना, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



### दूरदृष्टीचे कृषी अर्थतज्ञ- डॉ. बाबासाहेब

भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हा भारतीयांवर अनेक उपकार केले आहेत. शिक्षण, समानता, अर्थ, बँकींग, घटना निर्मिती, सामाजिक न्याय इ. विविध विषयांवर त्यांचे चिंतन, निरीक्षण व मुद्दे आजही गांभीर्याने घेण्यासारखे व महत्त्वाचे आहे.

आपल्याला कदाचित माहीत नसेल, स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटीश व्हॉइसरॉयच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे मंत्री होते. तेव्हा शेतीला हक्काचे पाणी देता येणे शक्य आहे की नाही हे जाणण्यासाठी उपलब्ध पाण्याचे ऑडीट केले होते. भारतात पाण्याचे ऑडीट ही त्यांची सर्वप्रथम संकल्पना होती.

उत्तर भारतात नद्यांना येणाऱ्या पुरांनी होणारे अपरिमित नुकसान तर दक्षिणेत पाण्याअभावी होणारे हाल पाहून त्यांनी १९४२ सालीच उत्तर-दक्षिण नद्यांना जोडणारा नदीजोड प्रकल्प पुरस्कारला होता.

१९५२ ला या प्रकल्पाची जोरदार चर्चा झाली पण शांत झाली. १९७७ च्या मोरारजींच्या सरकारने ८००० कोटी खर्चामुळे योजना गुंडाळली. सुदैवाने सध्याच्या सरकारला या नद्याजोड प्रकल्पाची पुनर्जाणीव झाली आहे. सांगायचं महत्त्वाचे म्हणजे ही संकल्पना बाबासाहेबांची.

नद्या जोड प्रकल्प पूर्ण झाला तर भारतात पुन्हा गोकुळ नांदून आर्थिक महासत्ता बनण्यास मदत होईल.

जमीनधारणा प्रश्न सोडवणे व जमिनीची उत्पादकता वाढवणे हेच शेती प्रश्नाचे उत्तर आहे असे ते म्हणायचे. दामोदर खोरे प्रकल्प, माही प्रकल्प, हिराकुंड धोरण या योजना त्यांनी सुरू केल्या. जलनीतीला राष्ट्रीय प्राधान्य असावे हा त्यांचा आग्रह होता. त्यांनी कृषी विद्यापीठे, संशोधन व व्यावसायिक सामूहिक शेतीचे समर्थन केले. एकूणच तत्त्वज्ञ, कायदेपंडित, सामाजिक सुधारक, अर्थतज्ञांसह डॉ. बाबासाहेब दूरदृष्टीचे कृषी अर्थतज्ञही होते. त्यांच्या स्मृती अभ्यासपर्ण जतन व्हाव्यात.

# कारची दुचाकी व रिक्षास धडक; महिलेचा मृत्यू तर २ जण जखमी

नगर - भरधाव वेगातील कारवरील नियंत्रण सुटल्याने कारने रस्ता क्रॉस करण्यासाठी थांबलेल्या दुचाकीस धडक देऊन पुढे रिक्षाला धडक दिली. आणि कार रस्त्यावरच पलटी झाली. या अपघातात तीन जण जखमी झाले. अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना पत्रकार चौकाकडून सिव्हिल हॉस्पिटलकडे जाणारा रोडवर ३० एप्रिल रोजी रात्री ९.३० ते १० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत तोफखाना पोलिस ठाण्यात अमन हमीद शेख, (वय ४३, रा. घासगल्ली कोठला, अ.नगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे पत्नी परवीन आणि मुलगी हयान सह होंडा कंपनीच्या ॲक्टीवा मोपेडवर (क्र. एम एच १६ सी एक्स १६६२) घरी जात असताना पत्रकार चौकाकडून सिव्हिल हॉस्पिटलकडे जाणारा रोड क्रॉस करण्यासाठी थांबले असता समोरुन येणाऱ्या स्विप्ट डिझायर कार ( क्र. एम एच १७ सी आर २२६०) वाहनावरील चालकाने त्याच्या ताब्यातील कार निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून फिर्यादीच्या मोपेडला समोरुन धडक दिली. या धडकेत फिर्यादीच्या दोन्ही हात व पायास दुखापत झाली.

तसेच फिर्यादीची पत्नी परवीन हिच्या डोक्यात गंभीर दुखापत होवुन रक्तस्त्राव झाला. व मुलगी हयान हिस किरकोळ दुखापत झाली. धडक दिल्यानंतर कार चालकाने तेथे न थांबता भरधाव वेगात निघून जाऊन पुढे प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षाला (क्र. एम एच १६ सी ई १२६५) देखील धडक देवून अपघात केला. व पुढे जाऊन ती कार पलटी झाली. अपघातातील जखमींना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान परवीन अमन शेख यांचा १ मे रोजी सकाळी मृत्यू झाला. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी अमन शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कारचालका विरुद्ध भा. न्या. सं. १८१, १२५ (अ) (३२४ (४५), सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४, १७७ प्रमाणे अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.

# बसस्थानकात महिलेच्या दागिन्यासह रोकडची चोरी

नगर - एसटी बसमध्ये बसण्यासाठी गर्दीतून आत प्रवेश करीत असताना महिला प्रवाशाच्या पर्समधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना माळीवाडा बस स्थानक येथे १ मे रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली.

या बाबत सोनाली सोमनाथ निक्रड (वय ३२, रा. दरेवाडी ता.नगर) या मिरी येथे जाण्यासाठी माळीवाडा बसस्थानक येथे एस टी बसची वाट पाहत थांबल्या. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास पांढरीपुल मार्गे नेवासा येथे जाणारी एस टी बस (क्र. एम एच १६ सी यू ६८६२) आल्यानंतर बसमध्ये बसण्यासाठी प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. गर्दीतून निक्रड या बसमध्ये जाऊन बसल्या. त्यानंतर त्यांनी त्यांच्या पर्समधील पाकिटामध्ये ठेवलेले सोन्याचे कानातील दागिने व रोख रक्कम पाहिली असता ती दिसून आली नाही. तेव्हा त्यांनी बसमध्ये पाकिटाचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही. यावरुन त्यांची खात्री झाली की बसमध्ये बसण्यासाठी आत प्रवेश करीत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने पर्स मधील ५ ग्रॅम ६२० मिली वजनाचे सोन्याचे कानातील दागिने व ९०० रुपये रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सोनाली निक्रड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक पंडीत या करीत आहे.

## चंद्रकलाबाई देशमुख यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी चंद्रकला शामराव जगताप (वय ७९) यांचे २ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ४ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विरेंद्र जगताप यांच्या त्या मातोश्री होत.

## लक्ष्मीबाई पिल्ले यांचे वृद्धापकाळाने निधन



भिंगार - सौरभनगर शेजारील लक्ष्मीनगर येथील रहिवासी लक्ष्मीबाई राजू पिल्ले (वय ९२) यांचे १ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुली, १ मुलगा, जावई, नातवंडे, सुन असा परिवार आहे.

### रयतचे निवृत्त प्राचार्य

## भाऊसाहेब कडूस यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - सारोळा कासार येथील रहिवासी रयत शिक्षण संस्थेतील



निवृत्त प्राचार्य तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त भाऊसाहेब कडूस (वय ८१) यांचे २७ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. भाऊसाहेब कडूस हे आरोग्य विमा वरिष्ठ विकास अधिकारी राम कडूस व नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठीतील पशुवैद्यक शास्त्रज्ञ डॉ. श्याम कडूस यांचे वडील होत.

त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई, दोन सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी आपल्या सेवेत असताना जिल्ह्यातील व पंचक्रोशीतील अनेक विद्यार्थी घडविले. रयतेचा शिक्षणाचा वटवृक्ष वाढविला व सेवानिवृत्ती नंतर त्यांचे हे कार्य अविरतपणे सुरू होते. शिस्तबद्ध तसेच मनमिळावू स्वभावाचे प्राचार्य कडूस परिसरात आण्णा म्हणून परिचीत होते.

## सिताराम पाटील धुळगंड यांचे निधन

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील मांडवे बु.।। येथील



जुन्या पिढीतील कुस्तीपटू सिताराम सखाराम पाटील धुळगंड (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले असून ते धार्मिक परोपकारी व कणखर स्वभावाचे होते.

त्यांच्या पश्चात ३ मुले भास्कर पाटील, दिनकर पाटील व प्रा. सोपान पाटील धुळगंड तसेच २ मुली सौ. चंद्रभागा लिंबाजी खेमनर व मिराबाई नामदेवराव खेमनर, पुतण्या राजाराम पाटील धुळगंड व ५ पुतण्या, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी अनेक वर्षे हभप वै. माणिकगिरी महाराज यांच्या वारकरी दिंडीचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. ते सह्याद्री विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक होते.

## श्रीमती सरस्वतीबाई बोरुडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - श्रीमती सरस्वतीबाई निवृत्ती बोरुडे (वय ६८) यांचे ३० एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राजेंद्र सुनील, संदीप बोरुडे यांच्या त्या मातोश्री होत.

## अजय गदीया यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील संजय ट्रेडिंग कंपनीचे मालक व कांदा व्यापारी अजय कांतीलाल गदीया (वय ४९) यांचे हृदयविकाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन भाऊ, दोन मुले असा परिवार आहे. संजय, विजय, रविंद्र, महेंद्र व जितेंद्र गदीया यांचे बंधू, चि.ऋषभ व संभव गदीया यांचे वडील होत.

## रामचंद्र शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - श्री कॉलनी, भूतकरवाडी येथील रहिवासी रामचंद्र



बाळाजी शिंदे (वय ८०, मूळ गाव देवठाण, अकोले) यांचे २९ एप्रिल रोजी निधन झाले.

त्यांच्यावर नालेगाव अमरधाम, अ.नगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते पाटबंधारे विभागातून सेवानिवृत्त झालेले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सुना, ३ नातवंडे असा परिवार आहे. वैभव रामचंद्र शिंदे, हर्षल रामचंद्र शिंदे (शारदा डेव्हलपर्स) यांचे ते वडील होत.

# पेंटिंगच्या कामाचे पैसे मागितल्याने नम्रता हॉटेलच्या चालकाकडून मारहाण

नगर - कलर पेंटींगच्या केलेल्या कामाचे पैसे मागितल्याचा राग येऊन हॉटेल चालकासह त्याच्या मुलाने व इतर दोघांनी पेंटरला शिवीगाळ करुन वीट मारुन जखमी केले. तसेच हातपाय तोडून टाकण्याची धमकी दिली. ही घटना एमआयडीसी परिसरातील रेणुकानगर येथील गणेश चौकातील नम्रता हॉटेल येथे ३० एप्रिल रोजी रात्री ९.३० वाजण्याचे सुमारास घडली.

या बाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात पेंटर विशाल याकुब पाटोळे (वय ३२, रा रेणुकानगर, अ. नगर) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे पेंटर असून कलर देण्याचे काम करतात. त्यांच्याकडे काही मजूर रोजंदारीवर काम करतात. फिर्यादी यांनी आदेश अविनाश धोंडे, अविनाश ऊर्फ नाना धोंडे (रा.गणेश चौक, नम्रता हॉटेल समोर, रेणुकानगर) यांच्या हॉटेल व घराला कलर देण्याचे काम घेतले. सुमारे एक महिन्यापासून दोन-तीन मजुरांसह पाटोळे हे धोंडे यांच्याकडे रंग देण्याचे काम करत होते. काम झाल्यानंतर मजुरांना पगार देण्याकरिता फिर्यादी हे झालेल्या कामाचे पैसे मागण्याकरिता धोंडे यांच्याकडे गेले. व त्यांनी धोंडे यांना झालेल्या कामाचे पैसे मागितले. त्यावेळी धोंडे यांनी अगोदर सर्व काम पूर्ण करा मग पैसे देणार असे म्हटले. त्यावर पेंटरने मजुरांना कामाची मजुरी द्यायची आहे. त्यामुळे झालेल्या कामाचे पैसे द्या असे म्हटले. याचा धोंडे यांना राग आल्याने आदेश धोंडे, अविनाश धोंडे यांनी पैसे देण्यास नकार देऊन शिवीगाळ करीत अगोदर सर्व कामे पूर्ण करा नंतर पैसे देऊ असे म्हटले. पेंटर पाटोळे यांनी मजुरांच्या मजुरी करता पैसे मागितले त्याचा राग आल्याने धोंडे यांनी हॉटेल मधील दोन कामगारांना बोलावून पेंटर पाटोळे यांना शिवीगाळ करुन गचांडी पकडून खाली पाडले. त्यातील एका कामगाराने जवळ पडलेली वीट उचलून पाटोळे यांच्या कानावर मारुन जखमी केले. तसेच परत येथे आलास तर तुझे हात पाय तोडून टाकू अशी धमकी दिली.या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. माणिक चौधरी आणि पोलीस हवालदार साबीर शेख यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात विशाल पाटोळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१, ३ (५) प्रमाणे मारहाणीचा गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलिस हवालदार साबीर शेख करीत आहे.

# आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्या चौघांवर गुन्हे दाखल

नगर - घरात वीज मीटर नसताना, अधिकृत वीज कनेक्शन न घेता विजेच्या खांबावरुन आकडा टाकून विजेचा चोरून वापर करणाऱ्यांवर महावितरणच्या पथकाने कारवाई करत त्यांच्यावर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. या बाबतची माहिती अशी की वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशान्वये महावितरणच्या गंजबाजार कक्ष कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी हे झेंडीगेट परिसरात वीजमीटरची तपासणी करीत असताना त्यांना मोहसीन मुस्ताक कुरेशी, सल्लाउद्दीन निजामुद्दीन शेख, अमन नसीम खान, सोहेल कुरेशी यांच्या घरी अधिकृत वीज कनेक्शन व वीज मीटर आढळून आले नाही. मात्र तरीही ते विजेचा वापर करत होते. त्यामुळे पथकाने अधिक तपासणी केल्यावर या सर्व ठिकाणी विजेच्या खांबावर आकडा टाकून वीज चोरी केली जात असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे पथकाने पंचनामे करून या सर्वांना २५ एप्रिल रोजी वीज कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये वीज बिले देण्यात आली होती. मात्र त्यांनी दिलेल्या मुदतीत वीज बिले भरली नाहीत. त्यामुळे याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात महावितरणचे सहाय्यक अभियंता स्वप्निल उल्हे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मोहसीन कुरेशी, सलाउद्दीन शेख, अमन खान, सोहेल कुरेशी व इतरांविरुद्ध वीज कायदा २००३ चे कलम १३५ अन्वये ४ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



अमेझिंग अबॅकसने आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये तब्बल १०३ विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

# अमेझिंग अबॅकसच्या १०३ विद्यार्थ्यांचे यश

नगर – अमेझिंग अबॅकसने आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये तब्बल १०३ विद्यार्थ्यांनी यश मिळविले. मार्च महिन्यात झालेल्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण नुकतेच हॉटेल यश ग्रँड येथे खा. निलेश लंके यांच्या हस्ते पार पडले. यावेळी माजी नगरसेवक योगिराज गाडे उपस्थित होते.

या स्पर्धेत अहिल्यानगर, संभाजीनगर, सिल्लोड, नागपूर, मुंबई, तसेच परदेशातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. अबॅकसच्या या स्पर्धेमध्ये एकूण १०३ विद्यार्थ्यांना घवघवीत यश मिळाले. सार्थक गाली, अनुश्री भापकर, विनीत महादेव, नुपूर भामरे, ओम झोडगेकर, आरव माकीजा, ओवी दंडाळे, गायत्री अहिरे, शुभ्रा तरोडे, हर्ष उखाणे, अर्जुन पाटील या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले.

अबॅकस ही गणिताची जुनी व अत्यंत प्रभावी तंत्रशुद्ध पद्धत असून त्यामुळे कमी वेळेत गणित सोडविण्याची कला अवगत होते. त्यामुळे अबॅकसचे महत्त्व वाढत आहे. या स्पर्धेमध्ये अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सिल्लोड, नागपूर, मुंबई व अशा देशा–परदेशातील विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा पार पडला. या वेळी विद्यार्थ्यांनी अबॅकसची प्रात्यक्षिके करून दाखवली. अवघड गणितांची उत्तरे अवघ्या काही सेकंदात सोडवून उपस्थित खा. लंके यांच्यासह सर्वांनाच आचंबित केले. खा. लंके यांनी अमेझिंग अबॅकसचे संचालक किरण बल्लाळ व अश्विनी बल्लाळ यांच्यासह विद्यार्थ्यांचे कौतुक केले. डिस्ट्रिक्ट लेव्हल कॉम्पिटिशन ऑफ अमेझिंग अबॅकसच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांसोबत पालकांनी सुद्धा दहा मिनिटांचा पेपर सोडवून सहभाग नोंदवला. यावेळी योगिराज गाडे यांनी सामान्यज्ञानावर आधारित खेळही घेतले.

यशस्वी विद्यार्थ्यांना किरण बल्लाळ व अश्विनी बल्लाळ, तसेच सहशिक्षक पोटे, प्रतीक्षा भवर, कांबळी जयश्री, प्रज्ञा विभूती, डिंपल शर्मा, मीनल बल्लाळ, कांचन दंडाळे, रेवती बल्लाळ, श्रद्धा देशमुख, शिल्पा गतफने, आशा पवार, ऐश्वर्या तोरडमल, धनश्री तोरडमल यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी सोहम गाली, दुर्वांक जाधव व ईशान बल्लाळ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रतीक्षा भवर यांनी केले. किरण बल्लाळ यांनी आभार मानले.

# मातृत्वम वुमेन्स मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा ४ मे रोजी अहिल्यानगरमध्ये होणार शुभारंभ

## डॉ. पंकज मते यांच्या संकल्पनेतून सर्व अत्याधुनिक उपचार व सुविधा महिलांसाठी एकाच छताखाली




नगर – नगर शहरात भारतातील पहिलेच खास महिलांसाठी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात आले आहे. अनुभवी स्त्री रोग तज्ज्ञ तथा लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ. पंकज मते यांच्या संकल्पनेतून मातृत्वम वूमेन्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सावेडी रोडवरील झोपडी कॅन्टीन समोर ए.आर. के. बिझनेस सेंटर येथे प्रशस्त जागेत खुले होत आहे. हॉस्पिटलचा शुभारंभ ४ मे रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे.

डॉ. पंकज मते यांनी एमबीबीएस नंतर डीजीओ, एमडी, एफआयसीजी आणि एफएमआयएसचे शिक्षण घेतले. ॲडव्हान्स गायनॅक एण्डोस्कोपिक सर्जरीत त्यांचा हातखंडा असून ते कॉस्मेटिक गानोकोलॉजीस्ट आहेत. त्यांचे पुणे आणि अहमदाबाद येथे रेडीएन्स कॉस्मेटिक गायनोकोलॉजी सेंटर होते. पुणे व नगर येथील विविध हॉस्पिटल येथेही त्यांनी एण्डोस्कोपीक शस्त्रक्रिया केल्या आहेत.



डॉ.पंकज मते

हॉस्पिटलचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. पंकज मते यांनी सांगितले की, महिला आरोग्य क्षेत्रात प्रचंड मोठी प्रगती झाली आहे. असे असले तरी खास महिलांसाठी स्वतंत्र मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नाही याची जाणीव होती. त्यामुळे नगरमध्येच देशातील पहिले महिला मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचे ठरवले. याठिकाणी महिला आरोग्यासंदर्भात बहुतांश उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम येथे असेल. तसेच गरोदर मातासाठी आयसीयु आणि नवजात शिशूंसाठी एनआयसीयु एकाच छताखाली असल्याने माता व तिच्या बाळाची ताटातुट होणारी नाही, तसेच नातेवाईकांचीही धावपळ कमी होईल.

अचूक निदान होणे कोणत्याही आजारांसाठी महत्त्वाचे असते. त्यासाठी जागतिक दर्जाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. ऑबस्टेट्रिक्स, गायनोकोलॉजी, इमरजन्सी ऑबस्टेट्रिक्स, फीटल मेडिसिन, कॉस्मेटिक गायनोकोलॉजी ॲण्ड ॲस्थेटिक, आयव्हीएफ व इन्फर्टिलिटी सेंटर, ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी व एण्डोस्कोपी, युरो गायनोकोलॉजी, कॅन्सर व कॅन्सर सर्जरी विभाग, युरो सर्जरी, रेडिओलॉजी, पेडियाट्रिक, सायकोलॉजी व सायकियाट्री, आयसीयु, एनआयसीयु, ऑर्थोपेडीक, जॉइंट रिप्लेसमेट, न्यूरोसर्जरी, जनरल शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी, नेत्रोपचार, असे विविध विभाग येथे आहेत. अद्ययावत पॅथोलॉजी लॅब असणार आहे.

हॉस्पिटलमध्ये प्रथमच लॅप्रोस्कोपीक व एण्डोस्कोपीक सर्जरीसाठी ३ डी ४ के आयसीजी स्टॉर्झ रूबिना सिस्टीम कार्यरत होईल, वॉटर बर्थ सुविधा, लॅप्रोस्कोपीक सर्जरी रूग्णांना एकाच दिवसात डिस्चार्ज, पूर्ण वेळ फीटल मेडिसिन कन्सल्टंट व डिपार्टमेंट, ऑन कॉल 24X7 स्त्री रोग उपलब्ध होतील अशा सर्व अत्याधुनिक सुविधा प्रथमच मातृत्वम वुमेन्स हॉस्पिटल येथे एकाच छताखाली मिळणार आहेत. ॲडव्हान्स अल्ट्रासाऊंड मशीन, डिलिव्हरी व केसरियन सेक्शनही असेल.

या उपचार सेवांचा महिलांनी लाभ घ्यावा तसेच शुभारंभ प्रसंगी उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. पंकज मते, डॉ. अनिल बेंद्रे, डॉ. अश्विनी बोरूडे, डॉ. आकांक्षा राठोड, डॉ. निलम बागल, डॉ. सारिका बांगर, डॉ. बाळासाहेब देवकर, डॉ. अशोक देठे, डॉ. ज्योत्ना डौले, डॉ. विष्णू देवरे, डॉ. अस्मिता फुंदे, डॉ. अतुल गुगळे, डॉ. हिरल गुजराथी, डॉ. सुनिल हजारे, डॉ. दिपक जायभाये, डॉ. प्राजक्ता जाधव, डॉ. सागर जयस्वाल, डॉ. आनंद काशिद, डॉ. किशोर खरड, डॉ. प्रदिप कंठाळी, दिप्ती करंदीकर, डॉ. कार्तिकी काळदाते, डॉ. महेश कर्डिले, डॉ. महेश लाटे, डॉ. दिपाली म्हस्के, डॉ. अनघा पारगांवकर, डॉ. दिपाली पटारे, डॉ. पुजा पोळ, डॉ. सुलभा पवार, डॉ. सागर शिरसाठ, डॉ. सतिश सोनावणे, डॉ. टेकवाणी प्रकाश, डॉ. मंजिरी झेंडे, डॉ. प्रथमेश झेंडे, डॉ. किशोर कवडे, डॉ. सचिन रक्ताटे, डॉ. सचिन वहाडणे व सर्व स्टाफने केले आहे.

# ‘अभिजात मराठी राजभाषा गौरव गीता’चे अनावरण



मराठी भाषेविषयी माहिती व मराठी भाषेची महती सांगणारे ’अभिजात मराठी राजभाषा गौरव गीता’चे अनावरण महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले.

नगर – मराठी भाषेविषयी माहिती व मराठी भाषेची महती सांगणारे ’अभिजात मराठी राजभाषा गौरव गीता’चे अनावरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले.

या गीताचे गायन अंजली गायकवाड, नंदिनी गायकवाड आणि अंगद गायकवाड यांनी केलेले आहे. गायकवाड भगिनी या ’सारेगमप लिटिल चॅम्प, संगीत सम्राट, तसेच लखनौ मधील क्लासिकल वॉईस या स्पर्धेच्या विजेत्या आहेत. अंजली गायकवाडला शाहू मोडक पुरस्कार, संगीत सम्राट पुरस्कार मिळालेले आहेत.

या गीताला गेल्या पंचवीस वर्षापासून संगीताचे शिक्षण देणारे अंगद गायकवाड यांनी संगीत दिलेले आहे. शुद्ध कल्याण हा मुख्य राग या गाण्यामध्ये वापरलेला आहे. याबरोबरच मिश्र मारु बिहाग, मिश्र भूप, मिश्र यमन, भटियार, शंकरा, हंसध्वनी, ललित, मारवा, पूरिया धनश्री या रागांचा वापर या गीतामध्ये करण्यात आलेला आहे.

या गाण्याचे गीतकार डॉ महेश दळे हे आहेत. मराठी भाषेतील कंदर्प वृत्तामध्ये या गाण्याचे बोल लिहिलेले आहेत.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे. या भाषेविषयी आपल्यापैकी प्रत्येकालाच वाटणारी तळमळ व तिच्या विषयीचा अभिमान गीतकाराने शब्दबद्ध केला आहे. या शब्दांना पूर्णपणे न्याय देईल, असेच संगीत संगीतकार अंगद गायकवाड यांनी दिलेले आहे. गीतकार व संगीतकारांच्या कौशल्यांवर शोभून दिसणारा मुकुट म्हणजेच गायकवाड भगिनी व त्यांचे गुरु व पिता अंगद गायकवाड यांचे सुमधुर गायन हे होय. ’सत्ययुग योगायुर्वेदम’ या यूट्यूब चॅनल वर हे गीत उपलब्ध करण्यात आलेले आहे. https://www.youtube.com/watch?v=BhFs3mV4sk तसेच सर्व ऑडिओ प्लॅटफॉर्मवर सुद्धा हे गीत उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

# मर्चंटस बँकेने सौ. श्वेता चोपडा यांना सभासदत्व द्यावे; मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे आदेश

नगर – सौ. श्वेता अमित चोपडा यांना अहमदनगर मर्चंटस बँकेचे सभासदत्व देण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संतोष चपळगांवकर यांनी ३० एप्रिल २०२५ रोजी दिले आहेत. या खटल्यात श्वेता चोपडा यांची बाजू ॲड. अभय दिलीप ओस्तवाल यांनी मांडली.

सौ. श्वेता चोपडा या बँकेच्या खातेदार व ठेवीदार असून त्यांनी सहकार विभागाच्या नियमानुसार सर्व आवश्यक कागदपत्रांसह सभासदत्वासाठी अर्ज केला होता. मात्र संचालक मंडळाने त्यांच्या अर्जास नकार दिला. त्यानंतर त्यांनी सहकार आयुक्तांकडे दाद मागितली. आयुक्तांनी श्वेता चोपडा यांना सभासदत्व बहाल करण्याचे आदेश दिले. सहकार आयुक्तांसमोर सौ. चोपडा यांच्यावतीने ॲड. सागर गुंजाळ यांनी बाजू मांडली. परंतु बँकेने त्या आदेशावर स्थगिती मिळवण्यासाठी सहकार मंत्र्यांकडे अपील केले. याप्रकरणात न्याय मिळवण्यासाठी श्वेता चोपडा यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. न्यायालयाने त्यांच्या युक्तिवादास मान्यता देत, बँकेला त्यांना सभासदत्व देण्याचे आदेश दिले. बँकेने या आदेशाविरोधात पुनर्विचार याचिका दाखल केली, परंतु ३० एप्रिल २०२५ रोजी तीही फेटाळण्यात आली, अशी माहिती बँकेचे सभासद राजेंद्र चोपडा यांनी दिली.




शिष्यवृत्ती परीक्षेत माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविल्याबद्दल मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते पुष्प गुच्छ व प्रत्येकी रुपये पाचशे देवून सत्कार करण्यात आला.

# शिष्यवृत्ती परीक्षेत ‘माऊंट सिनाय’चे यश

नगर – सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळातर्फे इयत्ता ५ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त केले.

इयत्ता ५ वी च्या परिक्षेत अंगद किरण काळे व प्रणव सचिन बोरुडे तर इयत्ता ८ वी मध्ये गौरी ईश्वर शेडाळे यांनी यश प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते पुष्प गुच्छ व प्रत्येकी रुपये पाचशे देवून सत्कार करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांना नेहा केदारे, सविता पाटोळे, रेणुका बानिया, उज्वला पंडित, अश्विनी कोरडे, कविता आढाव यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे संस्थापक डॉ. शाम खरात, विश्वस्त ज्योत्स्ना शिंदे, ज्योती हासे व राजेश चक्रे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते ‘जिल्हा क्रीडा पुरस्कारा’चे महाराष्ट्रदिनी वितरण



पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

नगर – गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री अहिल्यानगर डॉ. राधाकृष्ण विखे पाटील मंत्री यांच्या हस्ते सन २०१९–२० ते २०२३–२४ या पाच वर्षातील जिल्हा क्रीडा पुरस्काराचे वितरण

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर यांच्या वतीने क्रीडा क्षेत्रामध्ये जिल्ह्याचे नाव उज्वल करणाऱ्या खेळाडू, मार्गदर्शक, कार्यकर्ता /संघटक यांना दिले जाणारे जिल्हा क्रीडा पुरस्कार १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पोलीस मुख्यालयावरील मैदानावर प्रदान करण्यात आले. या पुरस्कार वितरण प्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, पोलीस अधीक्षक राकेश ओला, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे आदी उपस्थित होते.

सन २०१९ –२० गुणवंत क्रीडा कार्यकर्ता / संघटक पुरस्कार दिनेश लक्ष्मण भालेराव., गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार डेविड सुरेश मकासरे., गुणवंत खेळाडू पुरुष पुरस्कार सोमनाथ सपकाळ., गुणवंत खेळाडू महिला पुरस्कार अपूर्वा गोरे., गुणवंत खेळाडू पुरस्कार दिव्यांग सुहास मोरे., गुणवंत खेळाडू थेट पुरस्कार फिजा सय्यद.

सन २०२० –२१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार विजय मस्के. गुणवंत खेळाडू पुरुष किरण गहाणडुले. गुणवंत खेळाडू महिला वैष्णवी गोडळकर.

सन २०२१ –२२ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक विजय देशमुख. गुणवंत खेळाडू पुरुष श्रीनिवास कराळे. गुणवंत खेळाडू महिला विश्वेशा मिस्कीन.

२०२२ –२३ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक श्रीराम सेतू आवारी. गुणवंत खेळाडू पुरुष ओम करांडे. गुणवंत खेळाडू महिला कोमल वाकळे.

सन २०२३ –२४ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक लक्ष्मण उदमले. गुणवंत खेळाडू पुरुष ओंकार सुरत. गुणवंत खेळाडू महिला योगिता खेडकर व

गुणवंत खेळाडू पुरुष विशेष पुरस्कार शंकर गदाई यांना प्रदान करण्यात आला.

प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम रुपये दहा हजार असे पुरस्काराचे स्वरूप होते.

पुरस्कार सोहळा यशस्वी पार पाडण्याकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील भाऊराव वीर, संतोष वाबळे, विशाल गर्जे, प्रवीण कोंढावळे, प्रियांका खिंडरे, रमेश जगताप, मीना जगताप, साक्षी दळवी, सागर पवार यांच्याबरोबर ऑलम्पिक संघटनेचे पदाधिकारी शैलेश गवळी, संजय साठे, विजय मिस्किन, अविनाश काळे, मनीष राठोड यांनी परिश्रम घेतले.

## कुकडी प्रकल्प उन्हाळी हंगाम नियोजनासाठी ५ मे रोजी नगरमध्ये बैठक

नगर – कुकडी प्रकल्पाच्या उन्हाळी हंगाम २०२४–२५ च्या नियोजनासाठी कालवा सल्लागार समितीची बैठक ५ मे रोजी सायंकाळी ५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात (नियोजन भवन) आयोजित करण्यात आली आहे.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या उपस्थितीत व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे, अशी माहिती कालवा सल्लागार समितीचे सदस्य सचिव व कुकडी सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता सं. मा. सांगळे यांनी दिली आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **१.शेख इमरान युसुफ भाई २. समीर पापाभाई पठाण दोघे रा. वाळकी अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीनीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अहिल्यानगर / अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, जिल्हापरिषद हद्दीतील, मौजे **वाळकी** येथील खालील वर्णनाची मिळकत–

| | ग. नं. | हे. आर. | आकार |
|---|---|---|---|
| | ४४ | २.७० | २.०५ |
| पो. ख. | | ०.१७ | |
| | | २.८७ | |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची संपुर्ण ० हे ३० आर यापैकी ० हे २० आर जमीन मिळकती बाबत.

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – पैकी तुषार कासार, दक्षिणेस – पैकी रावसाहेब / गोरख बोठे

पश्चिमेस – रस्ता, उत्तरेस – विद्यमान मालक यांचे उर्वरीत क्षेत्र

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. ०२/०५/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट मिळकत विद्यमान मालक **श्री. जगन्नाथ भाऊसाहेब जपे रा. आदित्य बिल्डींग, ऐक्यनगर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर** यांचे मालकी वहिवाटीचा आहे. सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहिल्यानगर / अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहिल्यानगर / अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **बुऱ्हाणनगर** येथील बिगरशेती प्लॉटचे वर्णन खालील प्रमाणे.

| स. नं. | प्लॉट नं. | चौ. मी. |
|---|---|---|
| ६३/१/२/३ब | १८ | १९५.०० |

या संपुर्ण प्लॉट मिळकतीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – प्लॉट नं. १७ व रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नं. १५,

पश्चिमेस – सर्व्हे नं. ६३ पैकी, उत्तरेस – प्लॉट नं. १९,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. ०२/०५/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. शेख मोहसीन इलियास**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविणेत येते की, अहमदनगर येथील गुलाबसिंग कंपौड, नावाने असलेली मिळकत सी. टी. सर्व्हे क्रं. ७४४२ पुर्वीचा भू. मा. क्र. ३५२ (भिंगार) ही मिळकत युनायटेड चर्च बोर्ड फॉर वर्ल्ड मिनिस्ट्रीज (अमेरिकन मिशन) यांचे मालकी, ताबा कब्जा वापर व वहिवाटीची होती व आहे. ख्रिश्चन समाजातील मिशनमध्ये सेवा करणाऱ्या लोकांना नाममात्र किमतीमध्ये घरे बांधुन राहण्यासाठी मिशनने सदरची मिळकत परधर्मीयांना विकणार नाही व हस्तांतरीत करणार नाही या शर्ती व अटीवर विकलेली आहे. ख्रिश्चन समाज हा गरीब व अल्पसंख्यांक आहे, बाजुला चर्च आहे व शैक्षणिक संस्था आहेत. त्यामुळे जागा विक्री अथवा हस्तांतरीत करतांना इतर धर्मीयांना विकता येणार नाही. याच शर्तीवर दिलेली होती व आहे.

आम्हास खात्रीलायक समजलेले आहे की, काही घरमालक परस्पर जागा इतर धर्मीयांना हस्तांतरीत / विक्री करण्याचे विचारात आहेत. त्यामुळे भविष्यात परिसरात अशांतता निर्माण होऊन जिवीत व वित्त हानी होऊ शकते.

म्हणुन या जाहिर नोटीसीने जाहीर करणेत येते की, कोणीही सि. टी. सर्व्हे क्रं. ७४४२ जुना क्र. ३५२ या मिळकतीचे दान/ विक्री/ हस्तांतरण / बक्षिस / लिज व कोणताही व्यवहार करु नये. त्यास युनायटेड चर्च बोर्ड फॉर वर्ल्ड मिनिस्ट्रीज (अमेरीकन मराठी मिशन) संस्थेची सक्त हरकत आहे. तसेच व्यवहार केल्यास सिव्हील व फौजदारी स्वरुपाची कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-**

| सि.टी. सर्व्हे क्रं | जुना भू.मा.क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|
| ७४४२ | ३५२ (भिंगार) | अंदाज –२ एकर |

**डॉ. डी. जी. भाबळ** सचिव

**डॉ. विजया अॅ. जाधव** अध्यक्ष

**अमेरिकन मराठी मिशन आणि युनायटेड चर्च बोर्ड फॉर वर्ल्ड मिनिस्ट्रीज**


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे उद्घाटन



अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात नव्याने सुरु झालेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रूग्णालय मदत केंद्राचे उद्घाटन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे.

नगर – अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात नव्याने सुरु झालेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रूग्णालय मदत केंद्राचे उद्घाटन महाराष्ट्र दिनी जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पकंज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा शल्यचिकित्सक नागोराव चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी बापूराव नागरगोजे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे जिल्हा कक्ष अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. निळकंठ ठाकरे आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे म्हणाले, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांना लाभ देण्यासाठी या योजनेच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सोयी–सुविधा व उपचारांची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी, अशा सूचना करून मंत्री विखे म्हणाले, शासनाच्या महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, आयुष्यमान कार्ड, धर्मादाय रुग्णालय योजनांचा लाभ न मिळालेल्या गरजू रूग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून प्राधान्य लाभ देण्यात यावे. या योजनेची माहिती जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्र व रुग्णालयांमध्ये भितीपत्रकांच्या स्वरूपात प्रसिद्ध करण्यात यावी.

यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे जिल्हा कक्ष अधिकारी डॉ. निळकंठ ठाकरे यांनी या कक्षा मार्फत मिळणाऱ्या सेवांची माहिती दिली. ते म्हणाले, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र असलेल्या रुग्णांना संबंधित योजनेच्या जिल्हा समन्वयक यांच्या माध्यमातून संलग्नित रुग्णालयात प्रवेशित करण्याबाबत कळविण्यात येणार आहे. धर्मादाय रुग्णालयात प्रवेशित असलेल्या रुग्णांच्या बाबतीत, जिल्हा धर्मादाय उपायुक्त कार्यालयातून जिल्ह्यातील उपलब्ध धर्मादायाची संबंधित संस्थांची माहिती घेऊन त्यानुसार रुग्णाला रुग्णालयात प्रवेशित करण्याबाबत व सवलतीच्या दराने अथवा मोफत उपचार उपलब्ध करून देण्याकरीता लेखी स्वरुपात कळविण्यात येणार आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वर्षे वयापर्यंतच्या रुग्णांकरिता योजनेतील विहित व्याधी, विकार अनुरूप मोफत उपचार केले जातात. पात्र रुग्णांना जिल्ह्यातील योजनेशी संलग्नित रुग्णालयांना संदर्भीत करण्यात येईल. या योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या व या योजनांच्या निकषांच्या कक्षे बाहेरील रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीद्वारे वैद्यकीय उपचारार्थ अर्थसहाय्य दिले जाते.

या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष अंतर्गत संलग्न रुग्णालयांची यादी व पात्रता निकषांकरिता गरजूंनी या जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कक्ष अधिकारी श्री.ठाकरे यांनी केले आहे.

यावेळी महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक रोहित करांडे, जिल्हाप्रमुख प्रियंका गोसावी, दक्षता अधिकारी विठ्ठल वांडेकर, सुपरवायझर हर्षल साळवे, राष्ट्रवादी वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाध्यक्ष साईनाथ भगत, वैद्यकीय अधीक्षक अजय काळे, रा. स्व. संघाचे जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी, विचार भारतीचे महेंद्र जाखेटे, उदय भणगे, अनिल मोहिते, रवींद्र बारस्कर, विशारद पेटकर व विनायक देशमुख आदी उपस्थित होते.

# उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा.यांचे ३ मे रोजी नगर शहरात आगमन



नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे शिष्य, अर्हम विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा. व तीर्थेषऋषीजी म सा यांचे ३ मे रोजी आनंदधाम अहिल्यानगर शहरात आगमन होत आहे. प्रविणऋषीजी यांच्या पावन सान्निध्याचा व मार्गदर्शनाचा लाभ मिळवण्याची संधी सर्व गुरूभक्तांना मिळणार आहे. दोन दिवस ते नगरवासीयांसाठी आपल्या प्रवचनातुन 'व्यक्ती, समाज परिवर्तनाचे भविष्य नियोजनाचे' अमुल्य मार्गदर्शन देणार आहेत, अशी माहिती श्री वर्धमान स्थानकवासी सकल जैन श्री संघाच्यावतीने देण्यात आली.

उपाध्याय प्रविणऋषीजी म.सा.यांचे सायंकाळी ५ वाजता मार्केट यार्ड, महात्मा फुले चौक येथून आचार्यश्रींच्या कर्मभूमीत आनंदधाम येथे आगमन होईल. यानंतर रात्री ८ वाजता आनंदधामच्या प्रांगणात त्यांचे 'आओ निखारे तुटते रिश्ते, बिखरते परिवार' या विषयावर मंगल प्रवचन होणार आहे. ४ मे रोजी सकाळी ९ वाजता केशर गुलाब मंगल कार्यालय येथे 'दशा, दिशा एवम् लक्ष्य चातुर्मास २०२६' या विषयावर उद्बोधन होणार आहे. नगरमधील श्रावक श्राविकांसाठी उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा.यांचे प्रवचन जीवनाला दिशा देणारी, युवा वर्गाला प्रेरीत करणारी वैचारिक पर्वणी ठरणार आहे.

उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा.आचार्यश्रींची जन्मभूमी असलेल्या शिराळ चिचोंडी येथून अहिल्यानगर येथे येत आहेत. शिराळ चिचोंडी येथे त्यांच्या प्रेरणेने भव्य आनंदतीर्थ उभारण्यात येत आहे. याच ठिकाणी अक्षय्यतृतीयेला भव्य दिव्य वर्षीतप पारणा महोत्सव झाला. ज्यामध्ये देशभरातील तपस्वी व भाविक शिराळ चिचोंडी येथे आले होते. अशा या कार्यक्रमाला संपन्न करून उपाध्यायश्री नगरला येत असून भाविकांनी त्यांच्या सान्निध्याचा व प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी सकल जैन श्री संघाच्यावतीने केले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : अशोक (बाबूशेठ) बोरा, आदेश चंगेड़िया, राजेश भंडारी, सुनिल मुनोत, विलास कटारिया, सुरेश कांकरिया, संतोष शेटिया, सचिन देसरडा. ३ मे रोजी सकाळी ८.३० ते ९.३० यावेळेत प्रविणऋषीजी म.सा. यांचे महावीरनगर जैन स्थानकात प्रवचन होणार आहे.

या प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन महावीरनगर जैन स्थानकाचे अध्यक्ष अनिल कटारिया यांनी केले आहे.

# सीना नदीच्या उगमस्थानी साजरा होणार 'हास्य दिन'

### ट्रेकॅम्प संस्थेच्या वतीने ४ मे रोजी ट्रेकचे आयोजन; हास्य योगाचीही पर्वणी



नगर – जागतिक हास्य दिनानिमित्त जेऊर येथे सीना नदीच्या उगमस्थानी निसर्गप्रेमींसाठी ४ मे रोजी ट्रेकचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी हास्य योगाबरोबरच अनेक उपक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांनी दिली.

आपण सर्वजण रोजच्या धावपळीत धकाधकीत काही क्षण स्वतःला द्यायला विसरून जातो. परंतु सर्वांसोबत काही क्षण छान वेळ घालवणे, हसणे हे आपल्या आरोग्यासाठी गरजेचे आहे. त्यामुळे ट्रेकॅम्प संस्थेतर्फे येत्या रविवारी जागतिक हास्य दिनानिमित्त नगरकरांसाठी हास्य योगा आणि काही सरप्राईज ॲक्टिविटींचे नियोजन केलेले आहे. सीना नदीचे उगमस्थान नगरपासून १६ किलोमीटर अंतरावरील जेऊर या गावात आहे. तेथे असलेल्या महादेव खोरा मंदिर परिसरात ट्रेक आणि त्यासोबतच हास्य योगाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी साडेपाच वाजता सर्वांनी छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील सुरभी हॉस्पिटलजवळ जमावे. प्रवेश सर्वांसाठी मोफत असून नोंदणी करणे मात्र अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी ८६६८६०९२९९, ९४२२२२७५८७ या क्रमांकांवर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# चिचोंडी येथे साकारणार अर्हम् विज्ञा सेंटर



अर्हम् विज्ञा केंद्रिय कार्यालयाचा निर्मितीचा भुमी शुध्दीकरण सोहळा जैन विधी नुसार आचार्य भगवंत यांची जन्मभुमी चिचोंडी येथे उत्साहात झाला.

नगर – आचार्य भगवंत श्री आनंदऋषिजी म सा यांचे शिष्य उपाध्याय प्रवर अर्हम् विज्ञा प्रणेता प्रविणऋषिजी म सा यांच्या प्रेरणा आणि संकल्पनेतुन निर्माण झालेल्या अर्हम् विज्ञा केंद्रिय कार्यालयाचा निर्मितीचा भुमी शुध्दीकरण सोहळा जैन विधी नुसार आचार्य भगवंत यांची जन्मभुमी चिचोंडी येथे उत्साहात झाला.

माजीमंत्री राजेन्द्र दर्डा व मागील वर्षिच्या ऐतिहासिक चातुर्मास समितीचे अध्यक्ष पंकज फुलफगर यांच्या हस्ते हा श्रेत्र शुध्दीकरण सोहळा उत्साहात चतुर्विध संघाच्या साक्षीने झाला .

अर्हम् विज्ञाच्या ट्रेनर आणी साधकाचे मोठे जाळे संपुर्ण देशात आणी विदेशात पसरले असुन हजारो ट्रेनर च्या माध्यमातून सर्व समाजाच्या नैतिक मुल्यांकन वृध्दी आणी आदर्श जीवनप्रणालीचे सुत्र वाचन आणी ध्यान साधनेच्या माध्यमातून केले जात असुन गर्भ संस्कार पासुन जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत ची साधना आराधना अर्हम् विज्या च्या माध्यमातून शिकविले जाते हजारो ट्रेनर आणि लाखो साधकाच्या सोयीसाठी श्री गुरु आनंद फाऊंडेशन चिचोंडी च्या माध्यमातून हे भव्य अर्हम् विज्ञा सेटर उभे राहणार आहे

### जैन विधी व मंत्रोच्चारात क्षेत्र शुध्दीकरण सोहळा

हा सोहळा उपाध्याय प्रवर प्रविणऋषिजी म सा आदी ठाणा २ युवा तपस्वी श्री मुकेशमुनीजी म सा आदी ठाणा ५, महासती श्री सुनंदाजी म सा आदी ठाणा ६, महासती श्री आदर्शज्योतीजी म सा आदी ठाणा ३ महासती श्री ओजसदर्शनाजी म सा आदी ठाणा २ यांच्या पावन सान्निध्यता जैन विधी व जैन मंत्रोच्चारात हा सोहळा झाला. या ठिकाणी उभ्या राहणाऱ्या वास्तु मध्ये कुठल्याही जीवाची हानी मोऊ नये अशी मंगल प्रार्थना व क्षमापना ही यावेळी सामुहिक पणे करण्यात आली. याप्रसंगी गुरु आनंद फाऊंडेशन व अर्हम् विज्ञा चे पदाधिकारी अर्हम विज्ञाचे साधक उपस्थित होते

# ज्ञान मिळवताना प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर यश नक्कीच मिळते

### सुफी गायक पवन नाईक यांचे प्रतिपादन



सुफी गायक पवन नाईक यांनी आयएमएस सिडसीतर्फे आयोजित द पॉवर ऑफ व्हॉइस – आवाजाच्या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी या चार दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन करण्यात आले.

नगर – ज्ञान मिळवताना जर प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तर यश नक्कीच मिळते, असा आत्मविश्वासदायक संदेश सुफी गायक पवन नाईक यांनी आयएमएस सिडसीतर्फे आयोजित द पॉवर ऑफ व्हॉइस – आवाजाच्या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी या चार दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी दिला. ही कार्यशाळा २ ते ५ मे दरम्यान आयोजित करण्यात आली असून, दररोज सकाळी ११ ते २ आणि संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत दोन सत्रांमध्ये कार्यशाळा पार पडत आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना श्री. नाईक म्हणाले, माधुर्य, प्रसंगिकता, परिणामकारकता आणि आत्मविश्वास हे आवाजातील चार महत्त्वाचे घटक आहेत. त्यातील काही गुण जन्मसिद्ध असले तरीही, बहुतांश गुण मेहनतीने आत्मसात करावे लागतात. यासाठी योग्य गुरु, मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण सराव आवश्यक असतो.

ते पुढे म्हणाले की, नगरसारख्या ठिकाणी वीणा दिघे यांच्या सारख्या तज्ज्ञ मार्गदर्शकाच्या माध्यमातून अशी संधी उपलब्ध करून देणे, हे आयएमएसचे कौतुकास्पद पाऊल आहे. नगरकरांनी याचा पुरेपूर लाभ घ्यावा.

सहसंचालक डॉ. विक्रम बार्नाबस यांनी श्री. नाईक यांचे स्वागत करताना कार्यशाळेच्या उद्देशावर प्रकाश टाकला व संस्थेची भूमिका उलगडून सांगितली.

कार्यशाळेचे मार्गदर्शन सौ. वीणा दिघे करत आहेत, ज्यांना आवाज क्षेत्रातील दोन दशकांचा अनुभव आहे. त्या प्रभावी बोलणे, संवाद कौशल्य, आवाज विकसन आणि व्यक्तिमत्व विकास यांवर विशेष भर देत आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आय एम एस सिडसीच्या समन्वयक डॉ. ऋचा तांडुलवाडकर यांनी केले. यावेळी डॉ. प्रणोती तेलोरे, डॉ. स्वाती बार्नाबस तसेच आय एम एसचा संपूर्ण शिक्षकवर्ग आणि वर्कशॉप मधील विद्यार्थी उपस्थित होते.

ही कार्यशाळा १८ वर्षांवरील सर्व इच्छुकांसाठी खुली असून, अभिनय, निवेदन, शिक्षण, प्रशिक्षण, मुलाखतीसाठी तयारी करणारे तसेच सार्वजनिक बोलणं आत्मसात करू इच्छिणारे व्यक्तींसाठी ही एक उत्तम संधी ठरत आहे.

नगरमध्ये अशा प्रकारची कार्यशाळा प्रथमच आयोजित करण्यात आली असून, आवाजाच्या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




## ग्रामपंचायत चासनळी, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर
## जाहीर निविदा

ग्रामपंचायत चासनळी ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर येथील खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी –१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे.

| कामाचे नाव | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| मौजे चासनळी येथील गाव अंतर्गत भूमिगत पाईप गटार करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४–२५ | ३,५०,०००/– | सु.बे.अ. |
| मौजे चासनळी येथील मागासवर्गीय वस्तीमध्ये रस्ता मुरमीकरण करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४–२५ | २,८०,०००/– | खुला |
| मौजे चासनळी येथील पाणीपुरवठा चेंबर लिकेज व इतर कामे करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४–२५ | १,००,०००/– | खुला |
| * काम पूर्ण करण्याचा कालावधी – ६ महिने | | | |

**अटी व शर्ती** :- १) निविदा फॉर्म माहिती पत्रक दि. ०२/०५/२०२५ ते ०९/०५/२०२५ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी–१ निविदा दि.१०/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. ३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.
**निविदेसोबत** - १) जि. प.नोंदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४) अनुभवाचा दाखला

**ग्रामसेवक /सरपंच**
चासनळी ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर






सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील युकेजीच्या विद्यार्थ्यांना पदवीदान समारंभात प्रमाणपत्र देताना लेखक व दिग्दर्शक दीपक पापडेजा.

# सेंट विवेकानंद स्कूलमध्ये पदवीदान समारंभ उत्साहात

### काळा गाऊन व टोपी परिधान केलेल्या चिमुकल्यांनी वेधले लक्ष

नगर – सिंधी एज्युकेशन सोसायटीच्या सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील युकेजी मधून पहिलीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ नुकताच झाला. विद्यापीठात किंवा महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या पदवीदान समारंभाप्रमाणे काळा गाऊन व डोक्यावर काळी टोपी परिधान करून शाळेतील चिमुकल्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. लेखक व दिग्दर्शक दीपक पापाडेजा यांच्या हस्ते सर्व बालकांना पदवी प्रमाणपत्र देवून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. काळा गाऊन व टोपी परिधान केलेल्या पाल्याचा फोटो घेण्याचा मोह पालकांना आवरला नाही.

यावेळी सिंधी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रामचंद मेंघानी, उपाध्यक्ष रुपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखीजा, विश्वस्त महेश मध्यान, राजकुमार गुरुनानी, सुरेश हिरानंदानी, हरेश मध्यान आदींसह उपस्थित होते. या कार्यक्रम त कांचन पापडेजा यांची प्री प्रायमरीच्या प्रिन्सिपॉल म्हणून नियुक्ती करण्यात आली. माजी मुख्याध्यापिका गोदावरी कीर्तानी यांनी सौ. पापडेजा यांच्याकडे चार्ज दिला. यावेळी प्रिन्सिपॉल गीता तांबे व सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

यावेळी दीपक पापडेजा यांनी अवयव व देह दानाचे महत्व सांगून उपस्थितांना संकल्प करण्यचे आवाहन केल. ते म्हणाले, स्नेहालायाच्या माध्यमातून निर्मित केलेली 'जिंदगी मिलेगी फिरसे दुबारा' ही फ्लीम सध्या खूप हिट होत आहे. यामुळे अनेकांना आधार मिळाला आहे. आता स्नेहालायाच्या माध्यमातून अवयव व देह दानाबबत जनजागृती केली आजत आहे. आपल्या नंतरही कोणीतरी आपल्या अवयवांमुळे जागत असल्याने जिवंतपणी रक्तदान, मरणोत्तर नेत्रदान, अवयव दान व देह दानाचा सर्वांनी संकल्प करणे ही काळाची गरज आहे. सेंट विवेकानंद स्कूल खूप उपक्रमशील शाळा आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कायम प्रयत्नशील असल्याने ही शाळा केवळ अहिल्यानगर शहरातच नाही तर जिल्ह्यातही प्रसिद्ध आहे. या शाळातील विद्यार्थ्यांनी भविष्य मोठी प्रगती करून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे व शाळेचे नाव व विद्यार्थ्यांचे नाव आकाशाला भिडावे.

गोपाल भागवानी यांनी लहान विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना सर्व शिक्षक उत्कृष्ट मार्गदर्शन करत असल्याने यांचा पाया मजबूत होत आहे, असे सांगून शिक्षकांचे कौतुक केले.

प्राचार्य कांचन पापडेजा यांनी प्रास्तावीकात शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अभ्यासा बरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासा बरोबर आत्मविश्वास ही वाढवला जातो.

प्राचार्य गीता तांबे यांनी शाळेच्या सर्व उपक्रमांमध्ये सर्व पालक उत्साहात सहभागी होत असल्याबद्दल आभार मानले.

प्राथमिकच्या माजी मुख्याध्यापिका गोदावरी कीर्तनी यांनी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाची माहिती दिली.

यावेळी युकेजी मधील सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून आरोही हापसे व अबीर व्हानमाने यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सूत्रसंचालन आशा रंगलानी यांनी केले. तसनीम हकीमजीवाला यांनी परिचय दिला. कनन शेरवानी यांनी आभार मानले.







विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## बटू ग्रहावर बर्फाच्छादन

प्लूटोला एकेकाळी आपल्या ग्रहमालिकेत एक ग्रह म्हणून स्थान होते. मात्र, काही वर्षांपूर्वीच खगोलशास्त्रज्ञांनी त्याला 'खुजा, बटू ग्रह' (ड्वार्फ प्लॅनेट) ठरवून ग्रहमालिकेतून बाहेर काढले. अर्थात, तरीही त्याच्याविषयीचे कुतूहल शमलेले नाही. प्लूटोबाबत सातत्याने संशोधने होत असतात. प्लूटोच्या वातावरणाची पहिली रंगीत छायाचित्रे नासाच्या न्यू होरायझन्स यानाने पाठवलेली असून, त्यात बर्फाळ बटू ग्रहावर निळे आकाश दिसत आहे. प्लूटोच्या पृष्ठभागावर बर्फ दिसत आहे.



कोलोरॅडोतील साऊथवेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेचे प्रमुख संशोधक ॲलन स्टर्न यांनी सांगितले की, क्युपर पट्ट्यातील या बटू ग्रहावर एरवी कुणी निळ्या आकाशाची कल्पनाही केली नसेल. तेथील बर्फाळ धुक्याच्या कणांना राखाडी किंवा लाल रंग आहे; पण ज्या पद्धतीने ते निळा रंग पसरवतात, त्यामुळे न्यू होरायझन्स मोहिमेचे वैज्ञानिक चकित झाले आहेत. एसडब्ल्यूआरआय या संस्थेचे संशोधक कार्ली हॉवेट यांच्या मते त्या निळ्या रंगातून आपल्याला धुक्याच्या सदृशकणांची व्याप्ती व संरचना कळू शकते. आकाश हे काही लहान कणांनी नेहमी सूर्यकिरण विखुरले गेल्याने निळे दिसते. पृथ्वीवर नायट्रोजनच्या लहान रेणूंनी सूर्यकिरण पसरले जाऊन आकाश निळे दिसते, तर प्लूटोवरही आकाश काजळीसारख्या थोलिन या कणांमुळे निळे दिसते. वैज्ञानिकांच्या मते प्लूटोच्या वातावरणातील अगदी वरच्या थरात थोलिनचे कण असतात तेथे अतिनील किरणांचे विघटन होते व त्यातून नायट्रोजन व मिथेनचे रेणू तयार होतात. ते एकमेकांशी अभिक्रिया करतात. त्यामुळे धन व ऋणभारित आयन तयार होतात. ते पुन्हा एकत्र आल्यानंतर स्थूलरेणू तयार होतात. अशी क्रिया शनीचा चंद्र असलेल्या टायटन या उपग्रहावर दिसून आली आहे. अधिक गुंतागुंतीचे रेणू एकत्र येऊन त्याचे छोटे कण बनतात. अस्थिर वायूंचे संघनन होते व ते त्या कणांच्या पृष्ठभागावर बसतात. त्यामुळे बर्फाचे कण असल्यासारखे धुके दिसते. त्यामुळे प्लूटोच्या लालसर रंगातही भर पडते. न्यू होरायझन्स यानाने केलेल्या संशोधनानुसार प्लूटोच्या अनेक भागांत बर्फ आहे. राल्फ स्पेक्ट्रल कंपोझिशन मॅपरने ते शोधले आहे. प्लूटोच्या विस्तारित भागात सरसकट बर्फ दिसत नाही. कारण, तिथे अतिशय तरल अशा बर्फाचे थर आहेत. तेथे काही ठिकाणी पाणी आहे व इतर ठिकाणी नाही, याचे कारण शोधावे लागेल, असे जॅसन कुक यांनी सांगितले. रंगीत छायाचित्रात जिथे लाल रंग दिसतो आहे तिथे पाण्याचे बर्फ दिसते. ते लालसर दिसते, हे बघून आश्चर्य वाटते, असे मेरीलँड विद्यापीठाच्या सिल्व्हिया प्रोटोपापा यांनी सांगितले. पाण्याचे बर्फ व लाल रंगाचे थोलिन कण प्लुटोच्या पृष्ठभागावर आहेत. न्यू होरायझन्स अवकाशयान पृथ्वीपासून ५ अब्ज किलोमीटर दूर आहे, त्यातील सर्व प्रणाली व्यवस्थित काम करीत आहेत. ◆◆◆

## इजिप्तमधील पिरॅमिडवर नवा प्रकाश

हजारो वर्षांपूर्वीचे इजिप्त मधील पिरॅमिड जगातील आश्चर्यापैकी एक आहेत. मोठ्या आकाराच्या शिळा एकावर एक आखीव रेखीव पद्धतीने ठेवून निर्माण केलेली ही भव्य रचना आजही माणसाला चकित करते. या पिरॅमिडचे बांधकाम कसे झाले असावे, याबाबत सातत्याने नवनवे संशोधन होत असते. आता एका नव्या संशोधनानुसार हे पिरॅमिड बांधण्यासाठी हायड्रोलिक लिफ्टचा वापर झाला होता. पाण्याच्या साहाय्याने चालणाऱ्या यंत्राचा वापर करून अशा उत्तुंग रचना तयार करण्यात आल्या. बांधकामासाठी अतिशय वजनदार व मोठ्या आकाराच्या शिळा वापरल्या होत्या. हे वजन उचलण्यासाठी हायड्रोलिक लिफ्टच्या तंत्राचे साहाय्य घेण्यात आले होते.



नव्या संशोधनानुसार इजिप्तच्या सर्वात जुन्या म्हणजेच तब्बल ४,५०० वर्षांपूर्वीच्या पिरॅमिडची निर्मिती करण्यासाठी अत्यंत प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात आले होते. हे यंत्र चालवण्यासाठी पाणी वापरले जात असे. पीएलओएस वन या ऑनलाईन जर्नलमध्ये याबाबतच्या संशोधनाची माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार सक्कारामधील जोसरच्या प्रसिद्ध स्टेप पिरॅमिडच्या निर्मितीसाठी वापरलेल्या तंत्राचा छडा लागला आहे. हे पिरॅमिड १३,१८९ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जागेत पसरलेले असून, त्याची उंची ६२.५ मीटर आहे. ४,५०० वर्षांपूर्वीचा हा पिरॅमिड त्या काळात एक खास रचना होती. त्याच्या बांधकामासाठी हायड्रोलिक लिफ्ट पद्धतीचा वापर झाला. यापूर्वी असे मानले जात होते की, असे भव्य पिरॅमिड बनवण्यासाठी वापरण्यात येणारे दगड परस्परांना जोडलेल्या रॅम्प आणि लिव्हरच्या साहाय्याने वर नेले जात असत. मात्र, आता फ्रान्सच्या सीईए पॅलियोटेक्निक इन्स्टिट्यूटचे झेवियर लँडरेऊ यांनी म्हटले आहे की, प्राचीन इजिप्शियन लोकांनी अशा वजनदार दगडांना हलवण्यासाठी पॉवर लिफ्ट बनवल्या होत्या, ज्यासाठी जवळच्या कालव्याचा वापर करण्यात आला. पाण्याला दोन शाफ्टांच्या माध्यमातून पिरॅमिडमध्ये निर्देशित करण्यात आले, ज्यामुळे मोठ्या शिळा नेणाऱ्या फ्लोटला वर आणि खाली करण्यासाठी मदत मिळाली. प्राचीन इजिप्शियन लोक आपल्या अशा हायड्रोलिक इंजिनिअरिंगसाठी प्रसिद्ध होते. ते शेतीच्या सिंचनासाठीही कालव्यांचा तसेच मोठ्या प्रमाणात शिळांच्या परिवहनासाठी नावांचा वापर करीत होते. स्टेप पिरॅमिडची निर्मिती इसवी सन पूर्व २६८० मध्ये तिसऱ्या राजवंशाच्या फेरो जोसरच्या अंत्यविधीसाठी करण्यात आली होती. ◆◆◆

## अंटार्क्टिकामध्ये वाढतेय हिरवळ


दक्षिण ध्रुवावरील अंटार्क्टिका खंडामध्ये बर्फाची जाड चादर आहे. मात्र, हा अतिथंड प्रदेश जागतिक तापमानवाढीमुळे ऊबदार बनत चालला आहे. एका नव्या संशोधनातून दिसून आले की, तेथील हरित क्षेत्रामध्ये गेल्या काही वर्षांच्या काळात वेगाने वाढ झाली आहे. या बर्फाळ प्रदेशातील ही वाढती हिरवळ संशोधकांना अचंबित करीत आहे.

नेचर जियोसायन्स या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, गेल्या चार दशकांमध्ये अंटार्क्टिका खंडावरील वनस्पती आवरणात नाट्यमय वृद्धी झाली आहे. यामुळे पर्यावरणतज्ज्ञांसमोर एक नवी समस्या निर्माण झाली. भविष्यात हा प्रकार पृथ्वीसाठी धोकादायक ठरू शकतो, असे म्हटले जात आहे. एक्सेटर आणि हर्टफोर्डशायर विद्यापीठाच्या संशोधकांनी या संशोधनासाठी ब्रिटिश अंटार्क्टिका सर्वेक्षणासोबत हवामान बदलाबद्दल हिरवळीच्या सीमेचे आकलन करण्यासाठी सॅटेलाईट डेटाचा वापर केला. त्यांना आढळले की, या क्षेत्रात वनस्पती आवरण १९८६ मध्ये एक चौरस किलोमीटरपेक्षाही कमी होते. ते वाढून २०२१ पर्यंत १२ चौरस किलोमीटर झाले. ही वाढ दहा पटीपेक्षाही अधिक आहे. अलीकडच्या काळात ही वाढ वेगाने होत आहे. २०१६ आणि २०२१ दरम्यान हिरवळीच्या वाढीचा दर ३० टक्क्यांहूनही अधिक आहे. एक्सेटर विद्यापीठाचे डॉ. थॉमस रोलँड यांनी सांगितले की, अंटार्क्टिकाचा बहुतांश भाग अद्यापही बर्फाळ आहे. मात्र, वनस्पतींचे आच्छादन असणारा भागही वाढत चालला आहे. ◆◆◆



## मधमाशीच्या मेंदूवर नवं संशोधन

बॉ एका छोट्याशा मधमाशीचा मेंदू किती छोटा असेल, याचा अंदाज सहज करता येईल. संशोधकांनी प्रथमच एका प्रौढ मधमाशीच्या (फ्रूट फ्लाय) एक मिलिमीटर मेंदूचा विस्तृत नकाशा तयार केला असून, त्यात थोडेथोडके नव्हे, तर चक्क १.३९ लाखाहून अधिक न्यूरॉन्स आढळून आले आहेत. मेंदूतील तांत्रिक पेशींना न्यूरॉन्स असे संबोधले जाते. संशोधकांनी यावेळी असा दावा केला आहे की, मनुष्यासह अन्य सर्व प्राण्यांच्या मेंदूची अधिक माहिती घेण्यासाठी हा शोध अनन्यसाधारण महत्त्वाचा असणार आहे.



अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठातील संशोधकांनी यावर सखोल संशोधन केले. ड्रोसोफिला मेलानोगास्टर असे शास्त्रीय नाव असलेल्या मधमाश्या न्यूरोसायन्ससाठी महत्त्वपूर्ण मॉडेल सिस्टीम आहेत. त्यांचा मेंदू मनुष्याच्या मेंदूप्रमाणे अनेक समस्यांचे निराकरण करू शकतो, असा होरा आहे. या संशोधकांमध्ये समाविष्ट असलेल्या न्यूरोसायंटिस्ट माला मूर्ती म्हणतात, आम्ही ज्या प्रश्नाचे उत्तर शोधत होतो, त्यामध्ये मेंदूतील सर्व घटकांचे एकमेकांशी असणारे कनेक्शन, न्यूरॉन्स कशा पद्धतीने संचलित असतात, यावर मुख्य भर होता. आम्ही जो नकाशा तयार केला, त्यात वायर डायग्राम आहे. त्याला कनेक्टोम असे म्हटले जाते. या संशोधनात मधमाश्यांच्या जटिल व्यवहाराला मेंदूची अंतर्गत संरचना कशी कार्यरत राहते, हे समजून घेण्यावर भर दिला गेला. मधमाश्यांवर यापूर्वी देखील बरेच संशोधन केले गेले आहे. एका संशोधनात असे आढळून आले की, मधमाश्या वेगाने मार्गोत्क्रमण करत असताना एकाच जागी अचानक थांबू शकतात आणि त्यानंतर पुन्हा त्याच वेगाने पुन्हा पुढे जाऊ शकतात. आणखी एका संशोधनात मधमाश्यांचे पराग शोधण्याची कला आणि टापटीप याच्याशी संबंधित सर्किटसचे विश्लेषण करण्यात आले. ◆◆◆



## इशारा सौरवादळाचा


भूकंप, सुनामी, पूर, वादळ अशी नैसर्गिक संकटे पृथ्वीवर येत असतात. पण, अंतराळातूनही पृथ्वीवर अनेक संकटे आहेत, ज्याची माहिती आपल्याला नाही. त्यापैकीच एक म्हणजे सौरवादळ. पृथ्वीवर तशी अनेक वादळे, चक्रीवादळे पाहिली आहेत. पण, शास्त्रज्ञांनी अलीकडेच सौर वादळाचा इशारा दिला आहे. सूर्यावर आलेले हे वादळ पृथ्वीला धडकण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. या महिन्याच्या सुरुवातीलाच सूर्यावर दोन मोठे स्फोट झाले आहेत. सूर्याच्या पृष्ठभागावरून दोन मोठ्या सौर ज्वाला बाहेर पडल्या. त्यांना कोरोनल मास इजेक्शन म्हणतात, जे थेट पृथ्वीच्या दिशेने गेले आहेत. शास्त्रज्ञांनी त्यांना एक्स–७ आणि एक्स–९ अशी नावे दिली आहेत. सूर्यावर आलेल्या वादळावर भारतीय शास्त्रज्ञही लक्ष ठेवून एक्स–९ फ्लेअर हा गेल्या सात वर्षांतील सूर्यापासून निघणारा सर्वात शक्तिशाली फ्लेअर आहे. सूर्याचा एक्स–९ पृथ्वीवर सौर कणांचा वर्षाव करेल. द स्पेस वेदर वेबसाईट आणि अनेक तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, या आठवड्याच्या शेवटी एक मोठे वादळ मॅग्नेटोस्फियरला धडकण्याची शक्यता आहे. सौर वादळ म्हणजे सूर्याद्वारे सूर्यमालेत प्रक्षेपित केलेले कण, ऊर्जा, चुंबकीय क्षेत्र आणि पदार्थ यांचा अचानक झालेला स्फोट. या वादळाला भूचुंबकीय वादळ किंवा वादळ असे म्हणतात. भारत लडाखमधून सूर्यावर लक्ष ठेवतो. सूर्यावर आलेल्या वादळावर भारतीय शास्त्रज्ञही लक्ष ठेवून आहेत. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या तज्ज्ञांनी सांगितले की, त्यांनी भारतीय उपग्रह ऑपरेटरना सर्व खबरदारी घेण्यास सांगितले आहे. वादळ निळ्या ग्रहाकडे सरकत असल्याने पुढील काही दिवस पृथ्वीसाठी महत्त्वपूर्ण आहेत.

**इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांना बसणार या वादळाचा सर्वाधिक फटका**

भूचुंबकीय वादळे पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रात मोठा अडथळा निर्माण करू शकतात. यामुळे उत्तर गोलार्धात रेडिओ ब्लॅकआऊट, पॉवर आऊटेज आणि अरोरा इफेक्ट होऊ शकतात. दक्षिण अटलांटिक आणि आफ्रिकेच्या काही भागांमध्ये तात्पुरतेसंप्रेषण ठप्प होऊ शकते. पृथ्वीभोवती फिरणाऱ्या या उपग्रहांमध्ये किरकोळ व्यत्यय येऊ शकतो आणि कमी–फ्रिक्वेन्सी रेडिओ आणि नेव्हिगेशन सिस्टममध्ये समस्या निर्माण होऊ शकतात. मोबाईल, कॉम्प्युटर आणि कम्युनिकेशन सिस्टीम यांसारख्या इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांना वादळाचा सर्वाधिक फटका बसू शकतो. या वादळामुळे पृथ्वीवरील कोणालाही थेट इजा होणार नाही. कारण, पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र आणि वातावरण या सर्वात धोकादायक वादळांपासून आपले संरक्षण करते. ●●●

## पृथ्वीवर अवतरणार चांद्रभूमी

युरोपियन संशोधक पृथ्वीवर जणू काही चंद्रच आणण्याची तयारी करीत आहेत. युरोपियन स्पेस एजन्सी आणि जर्मन एअरोस्पेस सेंटरने जर्मनीच्या लूना ॲनालॉग फॅसिलिटीची स्थापना केली आहे. चंद्रावरील स्थितीची नक्कल करण्यासाठी बनवण्यात आलेली ही फॅसिलिटी भविष्यातील चांद्रमोहिमांसाठी अंतराळवीरांची मदत करण्यासाठी आहे. लूना ॲनालॉग फॅसिलिटीमध्ये ९०० टन ज्वालामुखीय शिळा आहेत, ज्या जर्मनीच्या आयफेल आणि इटलीच्या माऊंट एटनासारख्या भागातून आणलेल्या आहेत. या शिळांचा चुरा, तुकडे चंद्राच्या पृष्ठभागाची नक्कल करतात. ही फॅसिलिटी ७०० चौरस मीटर जागेत फैलावलेली आहे. अंतराळवीरांना चंद्रासारख्या स्थितीत काम करण्याचे ट्रेनिंग याठिकाणी देण्यात येईल. यामध्ये धुळीच्या वातावरणाचा सामना करणे आणि चंद्रावरील विवरांना समावेश आहे. चंद्रावरील कमी गुरुत्वाकर्षण स्थितीचीही नक्कल करण्यासाठी विशिष्ट ट्रॉलींचा वापर केला जाईल. एसाचे अंतराळवीर अलेक्झांडर गेर्स्ट यांनी या फॅसिलिटीची माहिती दिली आहे. याठिकाणी चंद्रावरील स्थितीची बहुतांशी नक्कल केली जाईल. त्यामध्ये चंद्राच्या पृष्ठभाग, धूळ, खडक आणि प्रकाशाचा समावेश आहे. याठिकाणी अशा स्पेससूटमध्ये अंतराळवीर वावरतील जे माणसाच्या चालण्या–फिरण्याच्या आणि पाहण्याच्या क्षमता मर्यादित करतात.



लूना फॅसिलिटीचे इंजिनिअर आणि मून स्ट्रॅटेजी लीड जुएर्गन श्लुत्ज यांनी सांगितले की, आमच्याकडे धुळीचे वातावरण आणि पृष्ठभागावरील गतिशीलता पुन्हा बनवण्यासाठी सुमारे ९०० टन सामग्री आहे. प्रोजेक्ट सध्या प्रोटोटाईपच्या टप्प्यात आहे. ◆◆◆


## उल्कापातांमुळे हरपले डायनासोर

एकेकाळी या पृथ्वीतलावर वेगवेगळ्या प्रजातीच्या, आकाराच्या शाकाहारी व मांसाहारी डायनासोरचेच सामाज्य होते. पाण्यात राहणारे व आकाशात उडू शकणारे डायनासोरही त्या काळात होते. सुमारे ६६ दशलक्ष वर्षांपूर्वी सहा मैल लांबीचा एक लघुग्रह पृथ्वीवर आदळला आणि त्यातच डायनासोरांसह सुमारे ७५ टक्के प्रजाती नष्ट झाल्या, असे प्रचलित सिद्धांत सांगतो. परंतु, नवीन संशोधन एका वेगळ्याच घटनेवर प्रकाश टाकत आहे.

डायनासोर नष्ट होण्यासाठी ही एकच घटना कारणीभूत झाली नव्हती. अलीकडेच गिनीच्या किनाऱ्यावर पाण्याखाली सापडलेल्या एका खड्ड्यावरील संशोधनातून शास्त्रज्ञ एका निष्कर्षापर्यंत येऊन पोहोचले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, त्याकाळी पृथ्वीवर अनेक उल्का कोसळल्या होत्या. 'नेचर' या संशोधनपत्रिकेत प्रकाशित शोधनिबंधात त्यांनी म्हटले आहे की, आणखी एक मोठी उल्का पृथ्वीवर आदळली असावी, त्यामुळे डायनासोर नामशेष होण्यास हातभार लागला असेल. स्कॉटलंडमधील हेरियट–वॉट विद्यापीठाने नादर नावाच्या दुसऱ्या खड्ड्याच्या त्रिमितीय प्रतिमा प्रसिद्ध केल्या आहेत. हा खड्डा एका उल्कापातामुळे तयार झाला आहे. या स्फोटाने साडेपाच मैलापेक्षा मोठा खड्डा तयार केला आहे. संशोधकांचा असा अंदाज आहे की, ही उल्का सुमारे १/४ मैल लांबीची होती आणि पृथ्वीवर आदळताना तिचा वेग ताशी ४५ हजार किमीपेक्षा जास्त होता. ही उल्का डायनासोरच्या सामूहिक नाशासाठी जबाबदार असलेल्या लघुग्रहापेक्षा आकाराने लहान असली, तरीही यामुळे एकत्रितपणे अधिक मोठा परिणाम निर्माण झाल्याचे दिसतो. डॉ. उइस्डियन निकोलसन, हेरीयट–वॉट विद्यापीठातील मरीन जिओलॉजिस्ट आहेत. त्यांनी २०२२ साली नादर खड्ड्याची प्रथम ओळख पटवली. परंतु, या घटनेमुळे नेमके काय परिणाम झाले याची कल्पना नव्हती. याबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की, ''नवीन संशोधन हे या विनाशकारी घटनेचे नेमके चित्र उभे करते.''



डॉ. निकोलसन यांच्या नेतृत्वाखालील शास्त्रज्ञांच्या टीमला खात्री आहे की, समुद्रतळावर झालेल्या उल्कापातामुळे ९ किलोमीटरचा खोलगट भाग तयार झाला आहे. परंतु, या घटनेचा नेमका काळ कोणता म्हणजे मेक्सिकोमधील १६० कि.मी. आकाराचा चिक्सुलुब खड्डा निर्माण करणाऱ्या लघुग्रहाच्या धडकेपूर्वी



किंवा नंतर ही घटना घडली, याबाबत त्यांना अद्याप ठोस माहिती मिळालेली नाही. या प्रभावाविषयी अधिक जाणून घेण्यासाठी, शास्त्रज्ञांनी थ्रीडी भूकंप इमेजिंगचा अवलंब करून या विवराचा आणि समुद्राच्या तळाच्या ३०० मीटर खाली आढळणाऱ्या इतर विविध भूभौतिकीय प्रभावांचा नकाशा तयार केला. ''जगभरात सुमारे २० समुद्री खड्डे निश्चित केले गेले आहेत आणि त्यापैकी कोणत्याही खड्ड्याचे इतक्या तपशिलात चित्रण झालेले नाही. हे चित्रण अतिशय उत्कृष्ट आहे,'' असे निकोलसन यांनी सांगितले. खड्ड्यांचा तळ हा छिन्नविच्छिन्न किंवा घासला गेलेला आहे. विशेषत:, हा खड्डा हजारो वर्षे जुना असल्यामुळे तळाचा शोध लावणे कठीण जाते. संशोधनानुसार, या उल्केच्या धडकेमुळे जोरदार भूकंप झाले. त्यामुळे महासागराच्या तळाखाली मऊ आणि ओलसर भूमी तयार झाली. या धडकेमुळे भूस्खलन झाले आणि ८०० मीटरपेक्षा उंच प्रचंड लाट तयार झाली, जी अटलांटिक महासागरभर पसरली असावी, असे अभ्यासक सांगतात. ◆◆◆



पाईपलाईन रोड येथील किसनगिरीनगर येथील गुरुदत्त भक्तीधाम मंदिराचा सातवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

# गुरुभक्ती ने व संत कृपेने जीवन सार्थकी होते

**हभप लक्ष्मण महाराज नांगरे यांचे प्रतिपादन; 'गुरुदत्त भक्तिधाम' मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त भंडाऱ्याचे आयोजन**

नगर – संत किसनगिरी बाबांचा महिमा अपरंपार आहे. गुरु भक्तीने मानवाच्या जीवनात आलेली संकटे दूर होतात. किसनगिरी बाबांनी धर्मासाठी खूप मोठे काम केले आहे. आपल्या अज्ञानाचे दूर करण्याचे काम संत करीत असतात. पैसा, धन, संपत्ती, मायाजाळ यामुळे मनुष्य नेहमीच दुःखी कष्टी राहिला आहे. भगवंताचे नामस्मरण, गुरुकृपा व संत सेवा यामध्ये खरा आनंद व समाधान मिळते. गुरुभक्ती ने व संत कृपेने जीवन सार्थकी होते, असे निरूपण हभप लक्ष्मण महाराज नांगरे यांनी केले आहे.

पाईपलाईन रोड येथील किसनगिरीनगर येथील गुरुदत्त भक्तीधाम मंदिराचा सातवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या कृपेने प्रातःस्मरणीय ह.भ.प. भास्करगिरीजी महाराज श्रीक्षेत्र देवगड यांच्या प्रेरणेने व ह.भ.प.स्वामी प्रकाशानंद गिरीजी महाराज यांच्या आशिर्वादाने विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सकाळपासूनच मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होती. पहाटे भगवान श्री दत्तात्रय मूर्तीस महाअभिषेक करण्यात आला. यावेळी अभंगवली ग्रंथाचे पारायण केले.

दुपारी भगवान श्री दत्तात्रयांची महाआरती करण्यात आली.आरती नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

संध्याकाळी गणेश बैरागी व सहकारी यांनी भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबानगर भक्त मंडळाच्या वतीने हभप लक्ष्मण महाराज नांगरे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी संत किसनगिरीनगर, पाईपलाईन रोड परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

# भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योगासाठी शेड व स्टेज उभारणीला प्रारंभ

नगर – भिंगार छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योग व प्राणायामासाठी उभारल्या जाणाऱ्या स्टेज व शेडच्या कामाचे भूमिपूजन अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर करण्यात आले. आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून १२ लाख ६० हजार रुपयांच्या खर्चातून होणाऱ्या या कामाच्या भूमिपूजनाचे आयोजन करण्यात आले होते. छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. या शेड उभारणीमागे हरदिन मॉर्निंग ग्रुपचा सातत्यपूर्ण पाठपुरावा असून, या शेडमुळे नागरिकांना पावसात व उन्हातही नियमित योग व प्राणायाम करता येणार आहे.



भिंगारच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योगासाठी शेड व स्टेज उभारणीला प्रारंभ करण्यात आला.

या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी रतन मेहेत्रे, रमेश वराडे, सर्वेश सपकाळ, दिलीपराव ठोकळ, अभिजीत सपकाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, महेश पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष मन्नूशेठ झंवर, चुनीलाल झंवर, इंजि. गणेश भोसले, सचिन चोपडा, संजय भिंगारदिवे, विकास भिंगारदिवे, सुनील हळगावकर, सुनील शिंदे, अनिलराव सोळसे, जहीर सय्यद, सुधीर कपाळे, मनोहर दरवडे, दीपक घोडके, दिलीप गुगळे, ईवान सपकाळ, जमान मुजावर, अशोक पराते, सरदारसिंग परदेशी, अशोकराव लोंढे, शिरीषराव पोटे, अनिल हळगावकर, अविनाश जाधव, विलास आहेर, अविनाश पोतदार, प्रकाश देवळालीकर, शशिकांत पवार, अ‍ॅड. उद्धवराव चेमटे, सुहासराव देवराईकर, शेषराव पालवे, प्रशांत भिंगारदिवे, नामदेवराव जावळे, सिताराम परदेशी, बाळासाहेब झिंजे, नवनाथ खराडे, रामनाथ गर्जे, योगेश चौधरी, खान सर, रावसाहेब हंसे, देविदास गंडाळ, दशरथराव मुंडे, सचिन कस्तुरे, शिवांश शिंदे, कुमार धतुरे, सुवर्णाताई महागडे–भिंगारदिवे, परदेशी ताई, कॉन्ट्रॅक्टर निखिल शिंदे, अनिकेत हळगावकर, ओंकार हळगावकर, बापूसाहेब निकत, विलासराव तोतरे आदींसह हरदिनचे सदस्य व नागरिक उपस्थित होते.

विक्रांत मोरे म्हणाले की, उद्यानाचा कायापालट करण्यासाठी हरदिन मॉर्निंग ग्रुपचा नेहमीच पुढाकार राहिला आहे. उद्यानातील विविध समस्या सोडविण्यासाठी त्यांचा पुढाकार असतो. स्टेज व शेड उभारणीचे काम देखील या ग्रुपच्या पाठपुराव्याने आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून मार्गी लागले आहे. ग्रुपच्या वतीने निरोगी आरोग्यासाठी सुरु असलेली आरोग्य चळवळ कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

संजय सपकाळ यांनी ग्रुपच्या रौप्य महोत्सवी वर्षात हे कार्य पूर्ण होत असल्याचे समाधान व्यक्त केले. ते म्हणाले की, योग आणि प्राणायामासाठी आवश्यक असलेली भौतिक सुविधा उपलब्ध होत असल्याने ही आरोग्य चळवळ अधिक जोमात पुढे जाणार आहे. या उपक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे.

प्रारंभी गौतम बुद्धांना अभिवादन करून परिसराची स्वच्छता करण्यात आली. सचिन चोपडा, संजय भिंगारदिवे व विकास भिंगारदिवे यांनी देखील हरदिनच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सुरु असलेल्या विविध सामाजिक, आरोग्य व पर्यावरण रक्षणासाठी सुरु असलेल्या उपक्रमाची माहिती दिली. सूत्रसंचालन ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे यांनी केले. ओंकार हळगावकर व निखिल शिंदे यांनी आभार मानले.

# रोटरी क्लब सेंट्रलच्या पुढाकाराने कामगार दिननिमित्त अग्निशमन दलासाठी दंततपासणी शिबिराचे आयोजन

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या वतीने कामगार दिनाचे औचित्य साधत १ मे रोजी अहिल्यानगर अग्निशमन केंद्र येथे दलातील जवानांसाठी मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रतिबंध हा उपचारांपेक्षा नेहमीच श्रेष्ठ या उद्दिष्टाने हे शिबिर घेण्यात आले असून, या शिबिरात एकूण ३५ अग्निशमन दलातील जवानांची तपासणी करण्यात आली.

याचे उद्घाटन रोटरीचे अध्यक्ष रो. डॉ. कुणाल कोल्हे यांच्या हस्ते तर त्यांच्या व त्यांच्या टीम मार्फत तपासणी करण्यात आले. यावेळी अग्निशमन विभागाचे प्रमुख शंकर मिसाळ, माजी प्रांतपाल रो. शिरीष रयाते, रो. अमर गुरप, राजीव गुजर, मनीष बोरा, इश्वर बोरा, हरीश नय्यर, विनोद बोरा व चेतन अमरापूरकर, अक्षय आव्हाड, फायरमन भरत पडगे, शुभम गावडे, सूरज पोकळे आदि सदस्य उपस्थित होते.




रोटरी क्लब सेंट्रलच्या पुढाकाराने कामगार दिननिमित्त अग्निशमन दलासाठी आयोजित दंततपासणी शिबीरामध्ये सहभागी झालेले कर्मचारी.

श्री. मिसाळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, जसे अग्निशमन व्यवस्थेच्या नियमित देखभालीअभावी गंभीर घटनांना तोंड द्यावे लागते, तसेच आरोग्याच्या बाबतीतही दुर्लक्ष केल्यास त्रास वाढतो. नुकत्याच पुणे, मुंबई, दिल्ली, हैदराबाद येथे झालेल्या आगीच्या घटनांमधून याचे भयावह चित्र समोर आले आहे. अग्निशमन यंत्रणा असूनही तिच्या देखभालीकडे दुर्लक्ष केल्याने गंभीर परिणाम उद्भवतात. हाच संदेश आरोग्यविषयक तपासण्यांमधूनही मिळतो.

डॉ. कुणाल कोल्हे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, फायर फायटर्स हे समाजासाठी अहोरात्र कार्य करणारे नायक असून, त्यांचे आरोग्य उत्तम राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आरोग्यासंबंधी नियमित तपासणी आणि प्रतिबंधात्मक उपाय हेच आजच्या काळात अत्यंत आवश्यक झाले आहेत. ज्या प्रकारे अग्निशमन यंत्रणा वेळेवर कार्यान्वित राहण्यासाठी तपासणी आणि देखभाल आवश्यक असते, त्याच प्रकारे आपल्या शरीराचीही काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने, आपण अनेक वेळा आरोग्याबाबत गाफील राहतो आणि आजार बळावल्यावरच उपचार घेतो. हे चित्र बदलणे आवश्यक आहे. त्यामुळेच रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलने या दंत तपासणी शिबिराचा उपक्रम हाती घेतला असून, हे केवळ तपासणीपुरते मर्यादित न राहता आरोग्यविषयी जागरूकतेचा संदेश देणारे पाऊल आहे.

या उपक्रमासाठी प्रकल्प प्रमुख रो. गिरीश मुळे यांनी योगदान दिले. यावेळी रो. राजीव गुजर यांनी सांगितले की, फायर सेफ्टी आणि जनजागृतीसाठी अशा प्रकारचे उपक्रम राबवण्यासाठी रोटरी कटीबद्ध असून, भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवले जातील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रोटरी सेंट्रल चे रो. अमर गुरप यांनी केले.





केडगाव येथील जैनाचार्य श्री शिवमुनीजी (जे.एस.एस.) गुरुकुलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा सांस्कृतिक सोहळा सोनेवाडी, अरणगाव रोडवरील शाळेच्या नव्या वास्तूमध्ये उत्साहात पार पडला.

# शाळेत विद्यार्थ्यांना एआय रोबोटिकचे धडे दिले जाणार

**आनंद कटारिया यांचे प्रतिपादन; जे.एस.एस. गुरुकुलचे स्नेहसंमेलन उत्साहात, छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचा इतिहास केला जिवंत**

नगर – डांगे पॅटर्नच्या आधारे शाळेची वाटचाल सुरू असून, २५ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही शाळा आज ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करत पुढील वर्षीपासून विद्यार्थ्यांना एआय व रोबोटिक्सचे शिक्षण देण्याची योजना असून, अद्ययावत कॉम्प्युटर लॅबच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, असे संचालक आनंद कटारिया यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत सांगितले.

केडगाव येथील जैनाचार्य श्री शिवमुनीजी (जे.एस.एस.) गुरुकुलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा सांस्कृतिक सोहळा सोनेवाडी, अरणगाव रोडवरील शाळेच्या नव्या वास्तूमध्ये उत्साहात पार पडला. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक शरद ठुबे, गुलाब कटारिया, अलका भळगट, शाळेचे संचालक आनंद कटारिया, प्राचार्या निकिता कटारिया यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राचार्या निकिता कटारिया म्हणाल्या की, शाळेच्या नव्या इमारतीसह विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, त्यांना दर्जेदार शिक्षण, संस्कार, आहार व व्यायामाचे प्रशिक्षण यावरही विशेष भर दिला जात आहे. योग, प्राणायाम आणि शिवकालीन खेळांमधून विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रयत्न होत आहे. ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन महाराष्ट्राच्या इतिहासाचे शिक्षण प्रत्यक्ष अनुभवातून देण्याचे उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योजक शरद ठुबे यांनी विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचे व शालेय विविध उपक्रमाचे कौतुक केले.

नवरस या संकल्पनेवर आधारित विविध नृत्य, गीतांनी स्नेहसंमेलनात रंग भरला. गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर नृत्याचे सादरीकरण केले. धार्मिक व मराठी गीतांमधून समहाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या दुष्परिणामांवर आधारित नाटिकेच्या माध्यमातून सोशल मीडियाच्या आहारी गेलेल्या पिढीच्या समस्यांकडे प्रभावीपणे लक्ष वेधले. विद्यार्थी अभ्यास सोडून पब्जी, इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉटसअप, यूट्यूब, फ्री फायर गेमच्या जगात अडकून स्वतःचे भवितव्य कसे उध्वस्त करतात? याची गंभीरता मांडण्यात आली. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील पराक्रमाचा इतिहास विद्यार्थ्यांनी जीवंत करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनी मराठी व हिंदी गीतांवर बहारदार नृत्य सादर करत एकच धमाल केली.

स्टुडंट ऑफ द इयर म्हणून प्रियल उपाध्याय (इयत्ता ५ वी) व देव सत्रे (इयत्ता ४ थी) यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या आहारासाठी वर्षभर प्रयत्न करणाऱ्या ४० महिला पालकांचाही गौरव करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित पालक, विद्यार्थी व शिक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कला गुणांना दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा पाठक व हर्षा कार्ले यांनी केले. अनुपमा तोरडमल व वैशाली देशमुख यांनी आभार मानले.

# आर्किटेक्चर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी (नाटा) शेवटची २ महिने

नगर – कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर नवी दिल्ली च्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेची नाव नोंदणी सुरु झाल्याची माहिती रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, वाळूंजचे विश्वस्त सी ए रमेश फिरोदिया यांनी दिली आहे.

नाटा २०२४ प्रवेश परीक्षेत जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले ते यावर्षी प्रवेशास पात्र असतील., नाटा ची परीक्षा विद्यार्थी ३ वेळा देऊ शकतात. नाटा २०२४ परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांसाठी काही बदल केलेले आहेत. हे बदल समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा. प्रवेश परीक्षा हि मे आणि जुन २०२५ च्या प्रत्येक शुक्रवारी आणि शनिवारी घेतली जाईल., विद्यार्थ्याने बारावी (१०+२) भौतिकशास्त्र, गणित या विषयासह उत्तीर्ण झालेला असावा किंवा डिप्लोमा (१०+३) गणित विषयासह उत्तीर्ण झालेला असावा.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रमेश फिरोदिया एजुकेशनल ट्रस्टच्या वतीने मार्गदर्शन वर्ग घेतले जात आहेत. इच्छुकांनी प्रा. मनोज कापरे (९५१८३३८२०२) व भूषण भगुरकर (८६०५०५३०२५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी सी. ए. रमेश फिरोदिया तसेच संस्थेचे सल्लागार विश्वस्त डॉ. शरद कोलते यांनी केले आहे.

# झारेकर गल्ली येथून अल्पवयीन मुलाचे अपहरण

नगर – क्लासला जातो असे सांगून घराच्या बाहेर गेलेला सोळा वर्षीय अल्पवयीन मुलगा बेपत्ता झाल्याची घटना ३० एप्रिल रोजी शहरातील झारेकर गल्ली येथे घडली. मुलाच्या घरच्यांनी त्याचा झारेकर गल्ली, नगर शहर तसेच त्याचे मित्रपरिवार व नातेवाईकांकडे चौकशी करुन शोध घेतला असता तो कोठेही मिळून आला नाही. यावरुन त्याचे कोणीतरी अज्ञात इसमाने, अज्ञात कारणासाठी अपहरण केले असावे असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी अपहृत मुलाच्या आईने दिलेल्या तक्रारी वरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात इसमाविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक कृष्णकुमार सेदवाड करीत आहे.

# केडगावमधून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचेतरी अमिष दाखवून पळवून नेल्याची घटना ३० एप्रिल रोजी रात्री साडेआठ वाजता सुमारास केडगाव परिसरातील साईनगर उपनगरात घडली.

अपहृत मुलीच्या घरच्यांनी तिचा केडगाव परिसर, नगर शहर, मैत्रिणीकडे व नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. यावरुन तिचे अज्ञात इसमाने अज्ञात करण्यासाठी अपहरण केल्याची खात्री झाली या प्रकरणी अपहृत मुलीच्या आईने कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीवरुन भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे करीत आहे.

# ग्रामस्थांनी रास्ता रोकोचा इशारा देताच सुरु झाले रस्त्याचे रखडलेले काम

नगर – नगर तालुक्यातील कौडगाव ते खांडके रस्त्याचे काम मंजूर झालेले असून या कामाची निविदा प्रसिद्ध होवून ठेकेदाराला कार्यारंभ आदेशही देण्यात आलेले आहेत. मात्र ठेकेदाराकडून गेल्या अनेक दिवसांपासून हे काम रखडवले गेले होते. या संदर्भात सरपंच आणि ग्रामस्थांनी १ मे महाराष्ट्र दिनी नगर – पाथर्डी रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा बांधकाम विभागाला दिल्यानंतर सदर काम ठेकेदाराने तातडीने सुरु केले.

नगर तालुक्यातील कौडगाव ते खांडके रस्त्याच्या कामासाठी खांडके गावचे सरपंच किरण चेमटे यांनी अनेकवेळा सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार करत पाठपुरावा केला होता. मात्र बांधकाम विभागासह संबंधित ठेकेदाराने या पत्रव्यवहाराकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे संतप्त झालेल्या खांडके ग्रामस्थांनी ३ एप्रिल रोजी कौडगाव येथे नगर पाथर्डी रोडवर रस्ता रोको आंदोलन केले. त्यावेळी बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांनी १५ एप्रिलपर्यंत काम सुरु करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र काम सुरु झाले नाही. त्यामुळे सरपंच व ग्रामपंचायत पदाधिकारी १६ एप्रिल रोजी बांधकाम विभागाच्या कार्यालयात गेले. तेथील अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यावेळी २१ एप्रिलपर्यंत काम सुरु करण्याचे आश्वासन दिले गेले. तेही पाळले नाही त्यामुळे ग्रामस्थांनी पुन्हा १ मे २०२५ रोजी शेतकरी व जनावरासह कौडगाव येथे नगर–पाथर्डी रोडवर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला. त्यामुळे बांधकाम विभागाला खडबडून जाग आली व त्यांनी ठेकेदाराला सक्त सूचना देत काम सुरु करण्यास सांगितले. त्यामुळे ठेकेदाराने तातडीने हालचाली करत काम सुरु केले आहे.



नगर तालुक्यातील कौडगाव ते खांडके रस्त्याचे काम सुरु झाले त्यावेळी उपस्थित सरपंच किरण चेमटे व ग्रामस्थ.

यावेळी सरपंच किरण चेमटे, ग्रामसेवक भाऊसाहेब पालवे, तंटा मुक्ती अध्यक्ष भगवान ठोंबे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सोमनाथ चेमटे, सुनील टांगळ, रावसाहेब साबळे, माजी सरपंच सुखदेव टांगळ, किशोर गाडे, दत्तू चव्हाण, चेअरमन बाळासाहेब चेमटे, व्हा. चेअरमन संतोष मचे, इस्माईल पठाण, उमाजी टांगळ, ऋतिक राठोड व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सर्जेपुरा परिसरातून २० वर्षीय तरुणी बेपत्ता

नगर – मला मेहंदी काढायचे काम आले आहे. तेव्हा मी कामाला जाऊन येते. असे फोनवरुन सांगून वीस वर्षीय तरुणी १ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजता घराबाहेर गेली. त्यानंतर ती बेपत्ता झाली आहे.

ती घरी न परतल्याने तिच्या कुटुंबीयांनी तिचा नगर शहरात तसेच सर्व नातेवाईकांकडे चौकशी करुन शोध घेतला असता तिच्याबद्दल काही एक माहिती मिळाली नाही. याप्रकरणी बेपत्ता तरुणीच्या नातेवाईकांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलिसांनी हरवल्याची नोंद केली असून पोलीस तिचा शोध घेत आहे.

